“ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार”

\- शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे

**Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha, Kolhapur**

# Dattajirao Kadam Arts, Science and Commerce College, Ichalkaranji

# LIBRARY

## Newspaper Clippings

## 2022-23 – PART 2.1

सकाळ

कोल्हापूर, मंगळवार, २७ सप्टेंबर २०२२

# फुलपाखरांचा अभ्यास काळाची गरज : उमराणे

## इचलकरंजीतील डीकेएएससी महाविद्यालयात व्याख्यान

**इचलकरंजी, ता. २६ :** अन्नसाखळीतील प्रमुख घटक म्हणून फुलपाखरांना महत्त्व आहे. परिसंस्थेतील फुलपाखरांचे अस्तित्व टिकवणे हे आपले राष्ट्रीय कर्तव्य असायला आहे. आता फुलपाखरे संकटात सापडली असून त्यांची ओळख निर्माण करून मदत करण्यासाठी पुढे आले पाहिजे. फुलपाखरांच्या विविधतेसाठी झाडांची विविधता महत्त्वाची असून पर्यावरणाचा ऱ्हास समजून घेण्यासाठी आता फुलपाखरांचा अभ्यास काळाची गरज आहे, असे प्रतिपादन फुलपाखरू अभ्यासक व संशोधक डॉ. संतोष उमराणे यांनी केले.

डीकेएएससी महाविद्यालयातील प्राणीशास्त्र विभागाच्या वतीने बिग बटरफ्लाय मंथनिमित्त 'जगातील सुंदर उडत्या आश्चर्यांची जागरूकता आणि संवर्धन' या विषयावर आयोजित व्याख्यानात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. फुलपाखरांच्या प्रजातींची माहिती गोळा करून त्यांचे कॅटलॉग आणि फुलपाखरू मोजणी करण्याच्या उद्देशाने या व्याख्यानाचे आयोजन केले होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अनिल पाटील तर इलेक्ट्रॉनिक्स विभागप्रमुख उपप्राचार्य प्रा. डी. ए. यादव यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. उमराणे म्हणाले, 'परागीकरणाचे मोठे काम फुलपाखरे करत असतात. निसर्ग पर्यटनातील एक आकर्षक आणि सौंदर्याचे मूल्य फुलपाखरू आहेत. फुलपाखरांबद्दल आताच जागृत झालो तर निसर्गचक्र संतुलित राहणार आहे. पर्यावरणात फुलपाखरांचे अस्तित्व, जीवनचक्र, खाद्य वनस्पती, मधुरस वनस्पती सात्विक आहार याबाबत मार्गदर्शन करत पर्यावरणातील त्यांचे महत्त्व स्पष्ट केले. तसेच परिसरात आढळणाऱ्या फुलपाखरांबद्दल माहिती दिली. फुलपाखरू संवर्धनातील समस्या विद्यार्थ्यांसमोर मांडत संवर्धनासाठी पुढे येण्याचे आवाहन केले. स्वागत व प्रास्ताविक प्राणीशास्त्र विभागप्रमुख डॉ. पी. के. वाघमारे यांनी केले. आभार प्रा. डॉ. निलोफर शेख यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. रेश्मा सनदी यांनी केले. प्रा. एस. एस. शेख, प्रा. एस. आर. पाटील आदी उपस्थित होते.



इचलकरंजी : बटरफ्लाय वॉकमध्ये झाडे, वेलींवरून भिरभिरणाऱ्या फुलपाखरांची विद्यार्थ्यांना माहिती देताना डॉ. संतोष उमराणे.

### ३२ फुलपाखरांची नोंद

कबनूर परिसरात बटरफ्लाय वॉकचे आयोजन केले. सकाळच्या सत्रात झाडे, वेलींवरून भिरभिरणाऱ्या फुलपाखरांचा आनंद विद्यार्थ्यांनी घेतला. डॉ. संतोष उमराणे यांच्या मार्गदर्शनाखाली बावडेकर मळा व कबनूर ओढ्यापर्यंतच्या परिसरात निसर्गप्रेमींनी दिसणाऱ्या प्रत्येक फुलपाखरांचे बारकाईने निरीक्षण केले. एकूण ३२ प्रकारच्या प्रजातीच्या फुलपाखरांची ओळख करून नोंद केली. एखाद्या महाविद्यालयाने प्रथमच असा पुढाकार घेत हा उपक्रम आयोजित केल्याने विद्यार्थ्यांना बटरफ्लाय वॉकचा पुरेपूर अनुभव घेता आला.

Scanned with CamScanner

तरुण भारत बुधवार, २८ सप्टेंबर २०२२

# डीकेएएससी कॉलेजमध्ये बिग बटरफ्लाय मंथ उत्साहात

**इचलकरंजी :** येथील डीकेएससी कॉलेजमधील प्राणीशास्त्र विभागांतर्गत बिग बटरफ्लाय मंथ निमित्ताने व्याख्यानाचे आयोजन केले होते. उद्घाटन प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांच्या हस्ते झाले. प्रास्ताविक डॉ. पी. के वाघमारे यांनी केले. वक्ते डॉ. एस. आर. उमराणे यांनी अवेरनेस अँड कॉन्झर्वेशन ऑफ ब्युटीफूल विंग्ड वंडर्स ऑफ द वर्ल्ड यावर व्याख्यान दिले. सूत्रसंचालन डॉ. रेश्मा सनदी यांनी केले. प्रा. डॉ. निलोफर शेख यांनी आभार मानले. यावेळी स्टाफ सेक्रेटरी डी. ए. यादव उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

पुढारी  बुधवार, २८ सप्टेंबर २०२२

# डीकेएएससी महाविद्यालयात रानभाज्या पाककृती महोत्सव

इचलकरंजी : दत्ताजीराव कदम आर्टस्, सायन्स अँड कॉमर्स महाविद्यालयामध्ये वनस्पतीशास्त्र विभागांतर्गत रानभाज्या पाककृती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. बी. एस्सी. व एम. एस्सी.तील विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या रान भाज्यांपासून केलेल्या पाककृती सादर केल्या. कार्यक्रमाचे उद्घाटन बाजीराव वासुदेव यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी प्रा. डी. ए. यादव होते. यावेळी वनस्पती शास्त्र विभाग प्रमुख डॉ. एस. टी. इंगळे यांनी रानभाज्यांची माहिती व उपयुक्तता विषद केली. पूर्वा पाटील व साया सय्यद यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. एम. वाय. शिंदे यांनी आभार मानले. उपक्रम यशस्वीतेसाठी प्रा. बी. एस. दोपारे, डॉ. ए. व्ही. कट्टी, प्रा. ए. एस. खोत, डॉ. एस. के. गावडे, प्रा. यु. व्ही. चौगुले, डॉ. यू. ए. देसाई, बी. बी. देसाई, व्ही. एस. जोग, एस. एम कांबळे यांनी विशेष परिश्रम घेतले.

Scanned with CamScanner

लोकमत

epaper.lokmat.com
कोल्हापूर, बुधवार, दि. २८ सप्टेंबर २०२२

## राष्ट्रीय सेवा योजना दिन साजरा

इचलकरंजी : डीकेएएससीमध्ये राष्ट्रीय सेवा योजना दिन साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अनिल पाटील होते. डॉ. पी. टी. माने यांनी उद्घाटन केले. डॉ. डी. सी. कांबळे व डी. ए. यादव यांनी मार्गदर्शन केले. प्रा. अरुण कटकोळे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. पी. के. वाघमारे यांनी सूत्रसंचालन व डी. जे. मुंगारे यांनी आभार मानले.

Scanned with CamScanner

# हिंदी सप्ताहानिमित्त पारितोषिक वितरण समारंभ

**इचलकरंजी :** दत्ताजीराव कदम आर्टस, सायन्स अँड कॉमर्स महाविद्यालयाच्या हिंदी विभागाच्यावतीने हिंदी सप्ताहाअंतर्गत घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांचा पारितोषिक वितरण समारंभ प्रमुख पाहुणे प्रा. सुधाकर इंडी (आक्कातांई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालय, इचलकरंजी) यांच्या हस्ते पार पडला. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे मा. प्रा. डॉ. अनिल पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी उपप्राचार्य डॉ. डी. सी. कांबळे उपस्थित होते. प्रास्ताविक हिंदी विभागाच्या प्रा. डॉ. अंजली उबाळे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. अर्चना तराळ यांनी केले. आभार प्रा. किशोरी टोणपे यांनी मानले.

केसरी
9921600800
28-9-2022

तरुण भारत गुरूवार, २९ सप्टेंबर २०२२

# डीकेएएससीमध्ये हिंदी सप्ताहानिमित्त पारितोषिक वितरण


**इचलकरंजी :** दत्ताजीराव कदम आर्टस, सायन्स अँड कॉमर्स महाविद्यालयाच्या हिंदी विभागाच्या वतीने हिंदी सप्ताहांतर्गत घेतलेल्या विविध स्पर्धांचा पारितोषिक वितरण आक्काताई पाटील कन्या महाविद्यालयाचे प्रा. सुधाकर इंडी यांच्या हस्ते झाला. प्रा. डॉ. अनिल पाटील, उपप्राचार्य डॉ. डी. सी. कांबळे, विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होत्या. प्रास्ताविक प्रा. डॉ. अंजली उबाळे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. अर्चना तराळ यांनी केले. आभार प्रा. टोणपे यांनी मानले.

CS Scanned with CamScanner

साप्ताहिक इचलकरंजी समाचार • गुरुवार २९-९-२०२२ •

# डी.के.ए.एस.सी.मध्ये राष्ट्रीय सेवा योजना दिन

इचलकरंजी : श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था संचालित, दत्ताजीराव कदम महाविद्यालय, इचलकरंजी येथे राष्ट्रीय सेवा योजना दिन संपन्न झाला. या दिनाच्या औचित्याने शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ मधील महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे उद्घाटन प्रमुख पाहुणे डॉ. पी. टी. माने यांच्या शुभहस्ते करण्यात आले. आपल्या भाषणात ते म्हणाले,राष्ट्रीय सेवा योजनेच्या विविध उपक्रमांमधून श्रमप्रतिष्ठा, सेवा, त्याग, नैतिकता, चारित्र्य, नेतृत्व संघटन, चिंतनशिलता, कलात्मकता व प्रयोगशीलता इ.



गुणांबरोबरच संविधानाप्रती आदर वाढीस लागून राष्ट्रीय एकात्मतेची जोपासना करत देश बलशाली करावयाचे कार्य केले. देश बलशाली करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनासारखा दुसरा पर्याय नाही.

प्रतिमापूजन व दीपप्रज्वलनाने प्रारंभ झालेल्या समारंभाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अनिल पाटील होते. अध्यक्षीय मनोगतात ते म्हणाले,विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण होऊन त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास राष्ट्राच्या उन्नतीत फार मोठे योगदान देत असतो.

कार्यक्रमास सकाळ सत्राचे प्रमुख प्रा.डॉ. डी.सी. कांबळे, दुपार सत्राचे प्रमुख प्रा. डी. ए. यादव यांची प्रमुख उपस्थिती होती. समारंभास राष्ट्रीय सेवा योजनाचे सदस्य प्रा. विशाल कांबळे व महाविद्यालयातील प्राध्यापकवर्ग उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. अरुण कटकोळे यांनी केले. आभार प्रदर्शन कार्यक्रम अधिकारी प्रा. डी. जे. मुंगारे यांनी केले. कार्यक्रमात राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक , स्वयंसेवविकांचा उत्साहपूर्ण सहभाग लाभला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. पी. के.

Scanned with CamScanner

# डीकेएएससी कॉलेजमध्ये रानभाज्या पाककृती महोत्सव संपन्न

**इचलकरंजी/महान कार्य वृत्तसेवा:**

दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज इचलकरंजी, वनस्पतीशास्त्र विभागाअंतर्गत रानभाज्या पाककृती महोत्सवाचे आयोजन करणेत आले होते. बी. एस्सी व एम.एस्सी.तील विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या रान भाज्यांपासून केलेल्या पाककृती सादर केल्या.

या कार्यक्रमाचे उदघाटन प्रमुख पाहुणे बाजीराव वासुदेव यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी दुपार सत्राचे प्रभारी प्रा. डी. ए. यादव हे होते. या वेळी वनस्पती शास्त्र विभाग प्रमुख डॉ. एस. टी. इंगळे यांनी रानभाज्यांची माहिती व उपयुक्तता विषद केली. सूत्रसंचालन कु. पूर्वा पाटील व कु. साया सय्यद यांनी केले. आभार डॉ. एम. वाय. शिंदे यांनी केले.

या कार्यक्रमासाठी प्रा. सौ. बी. एस. दोपारे, डॉ. ए. व्ही. कट्टी, प्रा. ए, एस. खोत, डॉ. एस. के. गावडे, प्रा. यु. व्ही. चौगुले, डॉ. यु. ए. देसाई, बी. बी. देसाई, व्ही. एस. जोग, एस. एम कांबळे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# दत्ताजीराव कदम महाविद्यालयांमध्ये स्वच्छता पंधरवडा दिन साजरा

केसरी वृत्तसेवा

**इचलकरंजी** : दत्ताजीराव कदम महाविद्यालयांमध्येएन. एस. एस व एन. सी. सी यांच्या संयुक्त विद्यमाने स्वच्छता पंधरवडा दिन साजरा करण्यात आला.

इचलकरंजी शहरातील मध्यवर्ती बस स्थानक या ठिकाणी स्वच्छता मोहीम राबवून एस टी बस स्थानकातील परिसर स्वच्छ करण्यात आला. तसेच ए एस सी महाविद्यालय ते बस स्थानक (छत्रपती शिवाजी महाराज पुतळा) पर्यंत स्वच्छता अभियान विषयी रॅली काढली गेली व इचलकरंजी शहरातील नागरिकांना स्वच्छते विषयी जनजागृती करण्यात आली. तसेच एसटी बस स्थानकातील व बाहेरील परिसर सर्व स्वच्छ करण्यात आला.

यावेळी एसटी आगारातील वाहतूक नियंत्रक प्रमुख ईजारे व थोरवत, आनंदा दोपारे यांचे सहकार्य मिळाले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य. डॉ. अनिल पाटील यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

या कार्यक्रमाचे नियोजन एन.एस.एस प्रमुख प्रा. अरुण कटकोळे, प्रा. डी. जे. मुंगारे, प्रा. मेजर मोहन वीरकर ,प्रा. प्रशांत कांबळे, प्रा. विशाल कांबळे यांनी केले. यावेळी एन.एस.एस व एन सी. सी चे सर्व कॅडेट उपस्थित होते.

केसरी
9921600800
3-10-2022

सकाळ
मंगळवार,
४ ऑक्टोबर २०२२



इचलकरंजी : एएससी महाविद्यालयातील एनएसएस व एनसीसी विद्यार्थ्यांनी मध्यवर्ती बस स्थानक परिसरात स्वच्छता मोहीम राबवली.

## ‘एएससी’तर्फे स्वच्छता अभियान रॅली

इचलकरंजी : दत्ताजीराव कदम एएससी महाविद्यालयातील एनएसएस व एनसीसीतर्फे स्वच्छता पंधरवडा दिन साजरा केला. शहरातील मध्यवर्ती बस स्थानक परिसरात स्वच्छता मोहीम राबवली. एएससी महाविद्यालय ते बस स्थानकापर्यंत स्वच्छता अभियान रॅली काढली. शहरातील नागरिकांत स्वच्छतेबाबत जागृती केली. प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली एनएसएस विभागप्रमुख प्रा. अरुण कटकोळे, प्रा. डी. जे. मुंगारे, एनएनसीप्रमुख प्रा. मेजर मोहन वीरकर, प्रा. प्रशांत कांबळे, प्रा. विशाल कांबळे यांनी मोहीम राबवली. एनसीसी सीनिअर अंडर ऑफिसर अर्पिता गड्डे व एनएसएस विद्यार्थी प्रतिनिधी प्रसाद चव्हाण यांनी विद्यार्थ्यांकडून स्वच्छता करून घेतली.

Scanned with CamScanner

लोकमत
epaper.lokmat.com
कोल्हापूर, बुधवार, दि. ५ ऑक्टोबर २०२२

## डीकेएएससीमध्ये पोस्टर प्रदर्शन

इचलकरंजी : येथील डीकेएएससीमध्ये पोस्टर प्रदर्शनाचे उद्घाटन प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी केले. माहिती तंत्रज्ञानात विकासक कसे व्हावे, क्लावूड कॉम्प्युटिंग, सायबर क्राइम, फाइव्ह जी तंत्रज्ञान, डिजिटल मार्केटिंग आणि ब्लॉक चेन तंत्रज्ञान हे पोस्टर प्रदर्शन विद्यार्थ्यांनी बनविले होते. प्रेरणा हळदकर यांनी प्रास्ताविक केले. यावेळी डॉ. डी. सी. कांबळे, डॉ. डी. ए. यादव यांच्यासह विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते. खुशी खंडेलवाल यांनी सूत्रसंचालन व अमृता निकम यांनी आभार मानले.

CS Scanned with CamScanner

सकाळ

शुक्रवार,
७ ऑक्टोबर २०२२



इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात एनसीसी विभागामार्फत शस्त्रास्त्र पूजन करण्यात आले.

# एएससी महाविद्यालयात शस्त्रास्त्र पूजन

इचलकरंजी, ता. ६ : दत्ताजीराव कदम एएससी महाविद्यालयामध्ये एनसीसी विभागामार्फत शस्त्रास्त्र पूजन केले. एनसीसी विभागातील एअरगण रायफल, डीपी रायफली, ५६ महाराष्ट्र बटालियन एनसीसी यांच्यामार्फत दिलेल्या डीपी पॉइंट टू रायफल व सर्व खेळाचे साहित्य यांचे खंडेनवमीनिमित्त पूजन केले. प्रास्ताविक प्रा. मेजर मोहन वीरकर यांनी केले. प्रमुख पाहुणे म्हणून तर दशरथ माने, अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अनिल पाटील उपस्थित होते. प्राचार्य डॉ. पाटील यांनी शस्त्र-अस्त्राच्या पूजनाविषयी व जुनी चालू रूढी परंपरा याबाबत मार्गदर्शन केले. आभार विश्वंभर कुलकर्णी यांनी मानले. प्रा. एम. बी. पाटील, प्रा. एस. एस. पाटील आदी उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

सकाळ

शुक्रवार,
७ ऑक्टोबर २०२२

## पीएच.डी. प्राप्त प्राध्यापकांचा सत्कार

इचलकरंजी, ता. ६ : डीकेएएससी महाविद्यालयातील पीएच.डी. प्राप्त प्राध्यापकांचा सत्कार केला. हिंदी विभागातील डॉ. अंजली उबाळे (अभिमन्यू अनत के उपन्यास में संघर्ष), मानसशास्त्राचे डॉ. इंद्रजित पाटील (अ कम्पेरिटिव्ह स्टडी ऑफ कॉपिंग स्टॅटर्जी, मेंटल डिप्रेशन अँन्ड सोशल अॅडजेस्टमेंट अमांग होस्टेल अॅन्ड नॉन होस्टेल स्टुडंट) संगणकच्या डॉ. सुलभा गाठ (डिझाईन अॅन्ड डेव्हलपमेंट ऑफ एक्स्पर्ट सिस्टीम फॉर डायग्नोसिस ऑफ कार्डिअॅक्ट डिसीज) यांचा सत्कार केला.

CS Scanned with CamScanner

सकाळ
सोमवार,
१० ऑक्टोबर २०२२



इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात रानभाजी पाककृती महोत्सवास उपस्थित नागरिक.

## रानभाजी पाककृती महोत्सव

**इचलकरंजी :** डीकेएएससी महाविद्यालयात रानभाजी पाककृती महोत्सव झाला. वनस्पतीशास्त्र विभागातर्फे आयोजित महोत्सवात बी.एस्सी. व एम.एस्सी.च्या विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या रानभाज्यांपासून तयार केलेल्या पाककृती सादर केल्या. प्रमुख पाहुणे बाजीराव वासुदेव यांच्या हस्ते उद्घाटन झाले. उपप्राचार्य डॉ. डी. ए. यादव अध्यक्षस्थानी होते. वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. एस. टी. इंगळे यांनी रानभाज्यांची माहिती व उपयुक्तता स्पष्ट केली. डॉ. रूपाली सांभारे व डॉ. अंजली उबाळे यांनी परिक्षक म्हणून काम पाहिले. प्रा. सौ. बी. एस. दोपारे, डॉ. ए. व्ही. कट्टी, प्रा. सौ. ए. एस.खोत, डॉ. एस. के. गावडे, प्रा. यु. व्ही. चौगुले, डॉ. यु. ए. देसाई, बी. बी. देसाई, व्ही. एस. जोग, एस. एम. कांबळे आदी उपस्थित होते. सुत्रसंचालन पूर्वा पाटील व साया सय्यद यांनी केले. आभार डॉ. एम. वाय. शिंदे यांनी मानले.

CS Scanned with CamScanner

तरुण भारत सोमवार, १० ऑक्टोबर २०२२

# डीकेएएससी कॉलेजमध्ये आयटी पोस्टर प्रदर्शन

**इचलकरंजी :** येथील डीकेएएससी कॉलेजमध्ये बी.कॉम आय.टी विभागाचे पोस्टर प्रदर्शन झाले. अत्याधुनिक माहिती तंत्रज्ञान संकल्पनेवरील प्रदर्शनाचे उद्घाटन इलेक्ट्रॉनिक्सचे संशोधक आणि प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांनी विद्यार्थ्यांनी बनविलेल्या माहिती तंत्रज्ञानात विकासक कसे व्हावे, क्लावूड कॉम्प्युटिंग, सायबर क्राईम, ५ जी तंत्रज्ञान, डिजिटल मार्केटिंग आणि ब्लॉक चेन तंत्रज्ञान अशा विविध विभागांतील कलात्मक, प्रयोगशील पोस्टर उपक्रमाचे कौतुक केले. डॉ. डी. सी. कांबळे, प्रा. डॉ. डी. ए. यादव यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी प्राध्यापक, विद्यार्थी, विद्यार्थिनी, प्रशासकीय कर्मचारी उपस्थित होते. प्रास्ताविक प्रेरणा हळदकर हिने केले. आभार अमृता निकम हिने मानले. सूत्रसंचालन खुशी खंडेलवाल यांनी केले.

CS Scanned with CamScanner

तरुण भारत

सोमवार, १० ऑक्टोबर २०२२

# डीकेएएस्सी महाविद्यालयातील पीएच. डी. प्राप्त प्राध्यापकांचा सत्कार

**इचलकरंजी :** येथील डीकेएएससी महाविद्यालयातील वेगवेगळ्या विषयांत पीएच. डी. प्राप्त प्राध्यापकांचा सत्कार करण्यात आला. हिंदी विभागातील डॉ. अंजली उबाळे (अभिमन्यु अनत के उपन्यास में संघर्ष), मानसशास्त्र विभागाचे डॉ. इंद्रजित पाटील (अ कम्पेरिटिव्ह स्टडी ऑफ कॉपिंग स्टॅटर्जी, मेंटल डिप्रेशन अँड सोशल ॲडजेस्टमेंट अमॉंग होस्टेल अँड नॉन होस्टेल स्टुडंट), संगणक शास्त्र विषयाच्या डॉ. सुलभा गाठ (डिझाईन अँड डेव्हलपमेंट ऑफ एक्सपर्ट सिस्टीम फॉर डाय`सिसं ऑफ कार्डिॲक्ट डिसीज) यांचा प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ. डी. सी. कांबळे, वरिष्ठ व कनिष्ठ विभागातील प्राध्यापक उपस्थित होते.

Scanned with CamScanner

सकाळ
सोमवार,
१० ऑक्टोबर २०२२

# माणसाचा हरित गुणांक वाढायला हवा : गाडगीळ

## वन्यजीव सप्ताहानिमित्त डीकेएएससी महाविद्यालयात व्याख्यान

सकाळ वृत्तसेवा

इचलकरंजी, ता. ९ : माणूस ही निसर्ग ओरबडणारी स्वार्थी विकासनीती आहे. हीच नीती निसर्गचक्रातील सर्व विनाशाला जबाबदार बनत आहे. निसर्ग हेच विज्ञानाचे मोठे द्योतक आहे. मात्र, आज कुठेच वैज्ञानिक दृष्टिकोन दिसत नाही. माणसाचा बुद्ध्यांक, भावनांक, याबरोबर आता हरित गुणांकही वाढायला हवा. ही सध्याची गरज असून, प्रत्येकाने हरित नागरिक झालेच पाहिजे, असे ठाम मत ज्येष्ठ पक्षी अभ्यासक प्रा. राजेंद्र गाडगीळ (जळगाव) यांनी मांडले.

डीकेएएससी महाविद्यालयात प्राणीशास्त्र विभागातर्फे वन्यजीव



इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात वन्यजीव सप्ताहानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रा. राजेंद्र गाडगीळ यांचे स्वागत करताना प्राचार्य डॉ. अनिल पाटील आदी.

सप्ताहानिमित्त आयोजित व्याख्यानात पक्षी निरीक्षणातून पर्यायी विकासनीतीकडे या विषयावर ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अनिल पाटील होते. उपप्राचार्य प्रा. डी. ए. यादव, फुलपाखरू अभ्यासक डॉ. संतोष उमराणे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रा. गाडगीळ म्हणाले, 'माणसाला गरज आणि हौस यांच्यातील फरक कळेनासा झाला आहे. सध्या जैवविविधतेतील निसर्ग विज्ञान भरकटलेल्या स्थितीत आहेत. नष्ट होणाऱ्या जैवविविधतेला वाचवायचे असेल तर निसर्ग विज्ञानाच्या सर्व विभागांनी एकत्र आले पाहिजे. शासनाने पर्यावरण वाचवण्यासाठी नवनवीन संकल्पनांना बळ देण्याची गरज आहे.'

प्रा. एस. एस. शेख, प्रा. आरती पोवार, प्रा. एस. आर. पाटील आदी उपस्थित होते. प्राणीशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. पी. के. वाघमारे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. वन्यजीव सप्ताह साजरा करण्याबाबतचा उद्देश स्पष्ट करत सप्ताहात घेण्यात येणारे विविध उपक्रमांची माहिती डॉ. वाघमारे यांनी दिली. प्रा. डॉ. रेशमा सनदी यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. निलोफर शेख यांनी आभार मानले.

CS Scanned with CamScanner

पुढारी कोल्हापूर, सोमवार, १० ऑक्टोबर २०२२

# इचलकरंजीच्या योगपटूंचा जलवा

## राष्ट्रीय स्पर्धेत सुवर्ण, रौप्यपदकांची कमाई

**अहमदाबाद : पुढारी वृत्तसेवा**

कोल्हापूर जिल्ह्यातील इचलकरंजी येथील प्रज्ञा गायकवाड आणि सानिका जाधवने महाराष्ट्र संघाला योगासनात सुवर्णपदक जिंकून दिले. ओम वरदाई आणि मनन कासलीवाल हे रौप्य पदकाचे मानकरी ठरले. तर रत्नागिरीच्या पूर्वा आणि प्राप्ती या बहिणींनी स्पर्धेत रौप्यपदकाचा बहुमान पटकावला.



सानिका जाधव



प्रज्ञा गायकवाड

महिलांच्या आर्टिस्टिक पेअर इव्हेंटमध्ये महाराष्ट्र संघाकडून प्रज्ञा आणि सानिका यांनी उल्लेखनीय कामगिरी केली. सर्वाधिक गुणाची कमाई करत या दोघींनी सुवर्णपदकाचा बहुमान पटकावला. यासह महाराष्ट्राच्या नावे तिसरे सुवर्णपदक नोंद झाले. प्रज्ञा, प्राप्ती, ओम आणि मनन हे इचलकरंजीच्या सोहम अ‍ॅकॅडमीचे खेळाडू असून ते नीलेश कागीणकर आणि सुहास पवळे यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करतात.

36th NATIONAL GAMES GUJARAT 2022

त्या पाठोपाठ रत्नागिरीच्या पूर्वा आणि प्राप्ती यांनी रौप्यपदक आपल्या नावे केले. त्यामुळे आता महाराष्ट्र संघाच्या नावे योगासन इव्हेंटमध्ये सहा पदकांची नोंद झाली. यामध्ये तीन सुवर्ण, दोन रौप्य आणि एका कांस्यपदकाचा समावेश आहे.



Scanned with CamScanner

पुण्यनगरी ■ सोमवार, १० ऑक्टोबर २०२२

# प्रज्ञा-सानिकाने जिंकले सुवर्णपदक

## पूर्वा-प्राप्ती बहिणींची रुपेरी कामगिरी

**अहमदाबाद ।** नागपूरच्या वैभव श्रीरामेच्या सोनेरी यशाच्या मोहिमेला कायम ठेवत प्रज्ञा आणि सानिकाने महाराष्ट्र संघाला योगासनात सुवर्णपदक जिंकून दिले. महाराष्ट्राच्या या दोन्ही युवा योगपटू आर्टिस्टिक इव्हेंटमध्ये चॅम्पियन ठरल्या. त्यामुळे महाराष्ट्र संघाला योगासनामध्ये आपल्या खात्यावर तिसऱ्या सुवर्णपदकाची नोंद करता आली. पदकाच्या याच कामगिरीला उजाळा देत रत्नागिरीच्या पूर्वा आणि प्राप्ती या बहिणींनी स्पर्धेत रौप्यपदकाचा बहुमान पटकावला. यासह पूर्वाने स्पर्धेत दुसरे पदक आपल्या नावे केले.

मुख्य प्रशिक्षक संदेश खरे आणि व्यवस्थापक सुहास पवळे यांच्या मार्गदर्शनाखाली योगासनात महाराष्ट्र संघ सर्वोत्तम यश संपादन करत आहे. महिलांच्या आर्टिस्टिक पेअर इव्हेंटमध्ये महाराष्ट्र संघाकडून प्रज्ञा आणि सानिका यांनी उल्लेखनीय कामगिरी केली. सर्वाधिक गुणाची कमाई करत या दोघींनी सुवर्णपदकाचा बहुमान पटकावला. यासह महाराष्ट्राच्या नावे तिसरे सुवर्णपदक नोंद झाले. त्या पाठोपाठ रत्नागिरीच्या पूर्वा



आणि प्राप्ती यांनी रौप्यपदक आपल्या नावे केले. त्यामुळे आता महाराष्ट्र संघाच्या नावे योगासन इव्हेंटमध्ये सहा पदकांची नोंद झाली. यामध्ये तीन सुवर्ण, दोन रौप्य आणि एका कांस्यपदकाचा समावेश आहे.



## इंजिनीयर पूर्वा-प्राप्तीची तपश्चर्या फळाला

रत्नागिरी जिल्ह्यातील पाली जवळच्या खेड्यात राहणाऱ्या पूर्वा आणि प्राप्ती किनरे या दोघींनी योगासन प्रकारात जागतिक स्तरावर आपला ठसा उमटवला. गत बारा वर्षांपासून अविरत मेहनत आणि प्रचंड इच्छाशक्तीच्या बळावर त्यांनी योगासनामध्ये यशाची मोठी उंची गाठली. आता ३६ व्या राष्ट्रीय स्पर्धेच्या माध्यमातून त्यांची योगासनातील तपश्चर्या पदकाच्या माध्यमातून फळाला आली आहे. पूर्वाची योगासनातील सर्वोत्तम कामगिरी पाहून लहान बहीण प्राप्तीलाही प्रेरणा मिळाली. प्राथमिक शिक्षक असलेल्या आणि खो-खोचे पंच असलेल्या वडिलांनी या दोन्ही मुलींना मोठे पाठबळ दिले. त्यामुळे त्यांना जागतिक स्तरावर आपला ठसा उमटवता आला. पनवेल येथील महाविद्यालयात इंजिनीअरिंगचे उच्च शिक्षण घेत असलेल्या पूर्वा आणि प्राप्ती यांनी अभ्यासाबरोबरच योगासनातील आपली साधना कायम ठेवली. पूर्वा ही इंजिनीअरिंगच्या चौथ्या वर्षाला, तर प्राप्ती ही तिसऱ्या वर्षाला शिकत आहे.

Scanned with CamScanner

सकाळ
कोल्हापूर, सोमवार, १० ऑक्टोबर २०२२

# इचलकरंजीच्या ओम, मनन जोडीला आर्टिस्टिक पेअर योगासनात रौप्य

## राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा : महाराष्ट्राची पदकांची लयलूट कायम

अहमदाबाद/इचलकरंजी, ता. ९ : येथे सुरू असलेल्या ३६ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या योगासनमध्ये महाराष्ट्र संघाला आज आणखी एक पदक मिळाले. इचलकरंजीतील इचलकरंजी हायस्कूलचा खेळाडू ओम वरदाई आणि व्यंकटेश्वरा कनिष्ठ महाविद्यालयाचा खेळाडू मनन कासलीवाल याने १९ वर्षांखालील गटात आर्टिस्टिक पेअर योगासन प्रकारात रौप्यपदक पटकावले. दोघे लहानपणापासून योगाचा सराव करीत असून, त्यांनी शालेय, राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा, खेलो इंडिया आदी स्पर्धेत सुवर्णपदक पटकावले आहे.

महाराष्ट्राच्या खेळाडूंची राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेमधील पदकांची लयलूट रविवारीही कायम राहिली. मल्लखांबमध्ये महाराष्ट्राच्या अक्षय तरळ याने सुवर्णपदक; तर शुभंकर खवले याने रौप्यपदक पटकावले आणि या खेळातील महाराष्ट्राचे वर्चस्व सिद्ध केले.

या क्रीडा प्रकारांमध्ये खेळाडूंना पुरलेला, टांगता आणि दोरीच्या मल्लखांबमध्ये आपले कौशल्य दाखवावे लागते. या तिन्ही प्रकारांची एकत्रित कामगिरी लक्षात घेतली जाते. अक्षय याने यामध्ये २६.८५ गुण मिळवले; तर शुभंकर याला २६.७० गुण मिळाले. अक्षय हा मुंबई उपनगरचा खेळाडू आहे.

अक्षय याने याप्रसंगी सांगितले, की राष्ट्रीय स्तरावर यापूर्वी मी सुवर्णपदक जिंकले असले, तरी माझ्या दृष्टीने येथील यश हे सर्वोत्तम यश आहे. येथील सुवर्ण


ओम वरदाई


मनन कासलीवाल

पदक माझ्या भावी वाटचालीसाठी चांगले व्यासपीठ आहे.

### मुष्टियुद्धामध्ये अजय व पूनम यांना पराभवाचा धक्का

महाराष्ट्राच्या अजय पेंदोर व पूनम कैथवास या दोन्ही खेळाडूंना मुष्टियुद्ध स्पर्धेत पराभव पत्करावा लागला. पुरुषांच्या ४८ ते ५१ किलो गटात अजय याला हरियानाच्या अंकित कुमार याने ५-० असे पराभूत केले. या लढतीत अजयने अंकितला चांगली लढत द्यायचा प्रयत्न केला; मात्र अनुभवाच्या जोरावर अंकिताने विजय मिळवला. अजयच्या लढतीच्या तुलनेत पूनम हिने मणिपूरच्या परमिता कुमारी हिला शेवटपर्यंत कौतुकास्पद लढत दिली. मणिपूरच्या खेळाडूने ही लढत ३-२ अशा फरकाने जिंकली. पूनम हिने दोन्ही हातांच्या ठोशांनी काही वेळा आक्रमक चाली केल्या. तसेच तिने अनेक वेळेला मणिपूरच्या खेळाडूचे ठोसे चुकवले. अखेर मणिपूरच्या खेळाडूने निसटत्या गुणांनी ही लढत जिंकली.

### वुशूमध्ये ओमकार, संकेत उपांत्य फेरीत

वुशू खेळात महाराष्ट्राला आणखी पदके मिळण्याची शक्यता वाढली आहे. ओमकार अनिल पवार आणि संकेत पाटील यांनी उपांत्य फेरी गाठून पदकाच्या आशा वाढवल्या आहेत.

### वैभवची पदकांची हॅट्ट्रिक


अक्षय तरळ.

यंदाच्या स्पर्धेतील दोन वेळचा चॅम्पियन वैभव श्रीरामेने आपला सहकारी शुभम सोबत ब्रॉंझपदक पटकावले. यातून वैभवला स्पर्धेमध्ये पदकांची हॅट्ट्रिक साजरी करता आली. त्याने दोन सुवर्ण आणि एक ब्रॉंझपदक पटकावले आहे.

### प्रज्ञा-सानिकाचे योगासनात सुवर्ण यश

नागपूरच्या वैभव श्रीरामेच्या सोनेरी यशाच्या मोहिमेला कायम ठेवत प्रज्ञा आणि सानिकाने महाराष्ट्र संघाला योगासनात सुवर्णपदक जिंकून दिले. महाराष्ट्राच्या या दोन्ही युवा योगपटू आर्टिस्टिक इव्हेंटमध्ये विजेत्या ठरल्या. त्यामुळे महाराष्ट्राच्या संघाला योगासनामध्ये आपल्या खात्यावर तिसऱ्या सुवर्णपदकाची नोंद करता आली. पदकाच्या याच कामगिरीला उजाळा देत रत्नागिरीच्या पूर्वा आणि प्राप्ती या बहिणींनी स्पर्धेत रौप्य पदकाचा बहुमान पटकावला.

Scanned with CamScanner

सकाळ
कोल्हापूर, मंगळवार, ११ ऑक्टोबर २०२२

# ओम-मनन जोडीची सलग दुसऱ्या दिवशी रौप्यची कमाई

## रिदमिक पेअर योगासनामध्ये इचलकरंजीचा झेंडा उंचाविला

अहमदाबाद/इचलकरंजी, ता. १० : इचलकरंजीच्या खेळाडूंनी आज सलग दुसऱ्या दिवशी राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत पदकांची कमाई केली. ओम वरदाई आणि मनन कासलीवाल यांनी १९ वर्षांखालील गटात रिदमिक पेअर योगासन प्रकारात रौप्य पदक पटकावले. ओम इचलकरंजी हायस्कूल, तर मनन हा डीकेएएससी महाविद्यालयाचा खेळाडू आहे. या दोघांच्या जोडीने कमाल करत महाराष्ट्र संघाला पदक मिळवून दिले. गेल्या दोन दिवसांत या राष्ट्रीय स्पर्धेत शहराने दोन सुवर्ण पदकासह आज चौथे पदक मिळविले आहे.

### मल्लखांबमध्ये महाराष्ट्राला अर्धा डझन पदके

महाराष्ट्राच्या शुभंकर खवले, अक्षय तरळ व रूपाली गंगावणे यांनी मिळवलेल्या सुवर्णपदकांसह


ओम वरदाई


मनन कासलीवाल

महाराष्ट्राने राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत सोमवारी येथे अर्धा डझन पदकांची कमाई केली.

शुभंकर या पुण्याच्या खेळाडूने पुरलेल्या मल्लखांबावर अप्रतिम कौशल्य दाखवले. त्याच्या कौशल्यात लवचिकता आणि वेग याचाही समावेश होता. दोरीच्या मल्लखांब प्रकारात अक्षय सुवर्णपदक जिंकले आणि दुहेरी कामगिरी केली. रविवारी त्याने वैयक्तिक सर्वसाधारण प्रकारात सोनेरी कामगिरी केली होती; तर शुभंकर याला रौप्यपदक मिळाले होते.

महिलांच्या विभागातील दोरीच्या मल्लखांब प्रकारात रूपाली गंगावणे हिने अपेक्षेप्रमाणे सुवर्णपदक पटकावले. तिची सहकारी नेहा क्षीरसागर हिला ब्रॉंझपदक मिळाले. रूपाली हिने रविवारी वैयक्तिक सर्वसाधारण विभागात विजेतेपद पटकावले.

महिलांच्याच पुरलेल्या मल्लखांब प्रकारात मात्र रूपाली हिला ब्रॉंझपदकावर समाधान मानावे लागले. तिची सहकारी जान्हवी जाधव हिने या प्रकारात रौप्यपदक पटकावले.

महाराष्ट्राने या स्पर्धेतील पुरुष सांघिक विभागात रौप्य पदक; तर महिलांच्या सांघिक विभागात सुवर्णपदक जिंकले होते. महाराष्ट्राच्या या यशात सुजित शेडगे, गणेश देवरुखकर, अभिजीत भोसले, सुनील गंगावणे, यशवंत जाधव, नंदिनी कोळसे, दीपाली दुदम इत्यादींचा महत्त्वाचा वाटा आहे.

Scanned with CamScanner

सकाळ
कोल्हापूर, बुधवार, १२ ऑक्टोबर २०२२

## राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा : इचलकरंजीच्या प्रज्ञा गायकवाडला दुसरे सुवर्ण

# महाराष्ट्र दुसऱ्या स्थानावर


प्रज्ञा गायकवाड

अहमदाबाद, ता. ११ : महाराष्ट्राच्या खेळाडूंनी येथे पार पडलेल्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेच्या अखेरच्या दिवशीही उल्लेखनीय कामगिरी केली. योगासन व सॉफ्टबॉल या खेळांमध्ये सुवर्ण यश संपादन करण्यात महाराष्ट्राच्या खेळाडूंना यश लाभले. सर्व्हिसेस स्पोर्टस् कंट्रोल बोर्ड यांनी पदकतालिकेत १२१ पदकांसह पहिला क्रमांक पटकावला; तर महाराष्ट्राने १३८ पदकांसह दुसरे स्थान पटकावले. हरियाना राज्य १०६ पदकांसह तिसऱ्या स्थानावर राहिले.

फॉर्मात असलेल्या विदर्भ कन्या छकुली सेलोकर, कल्याणी चिटे, कोकण कन्या पूर्वा आणि प्राप्ती किनारे आणि इचलकरंजीच्या मातीतील गुणवंत खेळाडू प्रज्ञा गायकवाड यांनी सर्वोत्तम कामगिरीचे प्रदर्शन करत राष्ट्रीय क्रिडा स्पर्धेत चॅम्पियन होण्याचा बहुमान पटकावला. या पाच कन्यांच्या सोनेरी यशाने महाराष्ट्र संघाला योगासनात पाचव्या सुवर्णपदकाची कमाई करता आली.

मुलींच्या संघात इचलकरंजीच्या प्रज्ञा गायकवाडचा समावेश होता. येथील श्रीमती आक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालयाची ती खेळाडू असून, तिने या स्पर्धेत डीकेएएससी महाविद्यालयाची खेळाडू सानिका पाटील हिच्यासोबत आर्टिस्टिक पेयर योगामध्येही सुवर्णपदक पटकाविले आहे.

महाराष्ट्र महिला संघाने मंगळवारी आर्टिस्टिक सांघिक गटात सुवर्णपदक पटकावले. महाराष्ट्र महिला संघाने अंतिम सामन्यात कुटील डावपेचाचे जाळे आखणाऱ्या यजमान गुजरात संघाला पिछाडीवर टाकले. १२८.८ गुणांच्या बळावर महाराष्ट्र महिला संघ सुवर्णपदक विजेता ठरला. त्यामुळे तीन गुणांच्या पिछाडीने यजमान गुजरातला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. त्यापाठोपाठ तमिळनाडू संघ ब्राँझपदक विजेता ठरला.

**चौथे पदक :** ऑरेंज सिटी नागपूरच्या राष्ट्रीय योगपटू छकुली सेलोकर यंदाच्या राष्ट्रीय स्पर्धेत दमदार पदार्पण करत चार पदकांची मानकरी ठरली. गुणवत्ता, लवचिकता आणि प्रचंड जिद्दीची क्षमता सिद्ध करत तिने हा बहुमान पटकावला. तिने पदार्पणातच तीन रौप्यसह एक सुवर्णपदक आपल्या नावे केले. आतापर्यंत केलेल्या मेहनतीचे फळ मला या पदकाच्या माध्यमातून मिळाले आहे. कौशल्य आणि क्षमता या स्पर्धेच्या माध्यमातून मला सिद्ध करता आली, अशा शब्दांत छकुलीने पदकाचा आनंद व्यक्त केला.

### पूर्वाची पदकांची हॅट्ट्रिक

कोकण कन्या रत्नागिरीच्या पूर्वाने आपले कौशल्य पणास लावत पदार्पणातच राष्ट्रीय स्पर्धेत पदकांची हॅट्ट्रिक साजरी केली. यामध्ये रौप्यसह तिने एक सुवर्णपदक आपल्या नावे केले. तिची सांघिक गटातील कामगिरी लक्षवेधी ठरली.

### सॉफ्ट टेनिसमध्ये ब्राँझ

राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत प्रथमच समावेश करण्यात आलेल्या सॉफ्ट टेनिस या क्रीडा प्रकारात महाराष्ट्राच्या राहुल उगलमुगले व आयुषा इंगवले या खेळाडूंनी पदापर्णातच ब्राँझपदक जिंकून एक नवा इतिहास घडवला आहे. मिश्र दुहेरीत महाराष्ट्र संघाने ब्राँझपदक जिंकले.

Scanned with CamScanner

पुढारी
कोल्हापूर, बुधवार, १२ ऑक्टोबर २०२२

# 'सुवर्णा'सन

## महाराष्ट्र योगासन संघाचा गोल्डन षटकार; आर्टिस्टिक सांघिक गटात पुरुष संघ चॅम्पियन

**अहमदाबाद :** योगासनातील 'विदर्भसम्राट' वैभव श्रीरामेने आपले कौशल्य आणि गुणवत्तेची लय कायम ठेवत महाराष्ट्र संघाला राष्ट्रीय स्पर्धेत गोल्डन षटकार मारून दिला. महाराष्ट्राचा पुरुष योगासन संघ आर्टिस्टिक सांघिक गटात सुवर्णपदक विजेता ठरला आहे. ऑरेंज सिटीच्या वैभव श्रीरामे, हर्षल चिटे, इचलकरंजीच्या मनन कासलीवाल, ओम वरदाई आणि पुण्याच्या नितीन पवळे यांनी उल्लेखनीय कामगिरीतून चॅम्पियन होण्याचा बहुमान पटकावला. महाराष्ट्र संघाने फायनलमध्ये १२८ गुणांची कमाई करत सुवर्णपदकावर नाव कोरले. अवघ्या एका गुणाच्या आघाडीने महाराष्ट्राला चॅम्पियन होण्याचा पराक्रम गाजवता आला. त्यामुळे १२७ गुणांसह हरियाणा संघाला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. या गटात यजमान गुजरातला कांस्यपदक जिंकता आले. महाराष्ट्र संघाच्या नावे राष्ट्रीय स्पर्धेत योगासन इव्हेंटमध्ये सहाव्या सुवर्णपदकाची नोंद झाली. यासह महाराष्ट्र संघाला योगासन इव्हेंटमध्ये अबाधित वर्चस्व राखता आले. वैभव श्रीरामे, मनन कासलीवाल, ओम, हर्षल आणि नितीन यांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. त्यामुळे त्यांना १२८ गुणांची कमाई करता आली.




## योगासनात मराठी कन्या ठरल्या चॅम्पियन; आर्टिस्टिक सांघिक गटात महिला संघ अव्वल

**अहमदाबाद :** फॉर्मात असलेल्या विदर्भकन्या छकुली सेलोकर, कल्याणी चिटे, कोकणकन्या पूर्वा आणि प्राप्ती किनारे आणि कोल्हापूर जिल्ह्यातील इचलकरंजीच्या गुणवंत खेळाडू प्रज्ञा गायकवाड यांनी सर्वोत्तम कामगिरीचे प्रदर्शन करत ३६ व्या राष्ट्रीय स्पर्धेत चॅम्पियन होण्याचा बहुमान पटकावला. या पाच कन्यांच्या सोनेरी यशाने महाराष्ट्र संघाला योगासनात पाचव्या सुवर्णपदकाची कमाई करता आली. महाराष्ट्र महिला संघाने आर्टिस्टिक सांघिक गटात सुवर्णपदक पटकावले. महाराष्ट्र महिला संघाने फायनलमध्ये कुटिल डावपेचाचे जाळे आखणाऱ्या यजमान गुजरात संघाला पिछाडीवर टाकले. १२८.८ गुणांच्या बळावर महाराष्ट्र महिला संघ सुवर्णपदक विजेता ठरला. त्यामुळे तीन गुणांच्या पिछाडीने यजमान गुजरातला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. त्यापाठोपाठ तामिळनाडू संघ कांस्यपदक विजेता ठरला.

Scanned with CamScanner

लोकमत . बुधवार, दि. १२ ऑक्टोबर २०२२

# विवेकानंद, न्यू कॉलेज, 'डी. वाय. पाटील'ची बाजी

## जिल्हास्तरीय युवा महोत्सवात ७६ महाविद्यालयांचा सहभाग

लोकमत न्यूज नेटवर्क

गडहिंग्लज : शिवाजी विद्यापीठाच्या जिल्हास्तरीय ४२ व्या युवा महोत्सवात कोल्हापूरच्या विवेकानंद कॉलेजने सहा कलाप्रकारात प्रथम क्रमांक पटकावून बाजी मारली. शिवाजी विद्यापीठ, न्यू कॉलेज व डी. वाय. पाटील इंजिनिअरिंग कॉलेजने प्रत्येकी तीन कला प्रकारात यश मिळविले. जिल्ह्यातील ७६ महाविद्यालयांतील १,३०० कलाकारांनी भाग घेतला होता.



गडहिंग्लज येथील डॉ.घाळी महाविद्यालयात आयोजित जिल्हास्तरीय युवा महोत्सवातील लोकनृत्य प्रकारातील एक क्षण.

स्पर्धेचा निकाल अनुक्रमे असा : लोककला- विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, कन्या महाविद्यालय इचलकरंजी, व्यंकटेश महाविद्यालय इचलकरंजी. लोकनृत्य- आजरा महाविद्यालय, दत्ताजीराव कदम कॉलेज इचलकरंजी, कर्मवीर हिरे कॉलेज गारगोटी.

मूकनाट्य- विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, भारती विद्यापीठ इंजिनिअरिंग कॉलेज कोल्हापूर, कॉमर्स कॉलेज कोल्हापूर. नकला- राजाराम कॉलेज कोल्हापूर, दत्ताजीराव कदम कॉलेज इचलकरंजी, डी.वाय. पाटील कॉलेज कोल्हापूर.

वक्तृत्व मराठी- भोगावती महाविद्यालय कुरकली, यशवंतराव चव्हाण कॉलेज हलकर्णी, विवेकानंद कॉलेज. हिंदी- विवेकानंद कॉलेज, न्यू कॉलेज, शहाजी लॉ कॉलेज कोल्हापूर. इंग्रजी- विवेकानंद कॉलेज, के.आय.टी. कॉलेज कोल्हापूर, शिवाजी विद्यापीठ.

समूहगीत- विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, दत्ताजीराव कदम कॉलेज इचलकरंजी, कॉमर्स कॉलेज कोल्हापूर. पथनाट्य- आनंदी फार्मसी कॉलेज कळंबे तर्फ कळे, दूधसाखर महाविद्यालय बिद्री, विवेकानंद कॉलेज कोल्हापूर. प्रश्नमंजूषा- तात्यासाहेब कोरे इंजिनिअरिंग कॉलेज वारणानगर, डी.वाय. पाटील इंजिनिअरिंग कोल्हापूर, महावीर महाविद्यालय कोल्हापूर.

### आटपाडीत मध्यवर्ती महोत्सव

१६ ते १८ ऑक्टोबरअखेर मध्यवर्ती युवा महोत्सव आटपाडी येथील बाबासाहेब देसाई महाविद्यालयात होणार आहे.

Scanned with CamScanner

सकाळ
बुधवार,
१२ ऑक्टोबर २०२२

# विवेकानंद कॉलेजची बाजी

## जिल्हास्तरीय युवा महोत्सव; दत्ताजीराव कदम व न्यू कॉलेजचे विद्यार्थीही चमकले

गडहिंग्लज, ता. ११ : शिवाजी विद्यापीठाचा ४२ वा जिल्हास्तरीय युवा महोत्सव उत्साहात झाला. येथील डॉ. घाळी महाविद्यालयाने महोत्सवाचे संयोजन केले होते. १५ कलाप्रकारांत ७६ महाविद्यालयांतील १२६५ स्पर्धक विद्यार्थ्यांनी सहभागी होत आपली कला सादर केली. यात विवेकानंद कॉलेजच्या (कोल्हापूर) विद्यार्थ्यांनी दमदार कामगिरी करीत बाजी मारली. त्याखालोखाल दत्ताजीराव कदम कॉलेज (इचलकरंजी) व न्यू कॉलेजचे (कोल्हापूर) विद्यार्थी चमकले. विशेष म्हणजे पावसातही विद्यार्थ्यांच्या उत्साहाला भरते आले होते.



गडहिंग्लज : घाळी महाविद्यालयात झालेल्या युवा महोत्सवात कला सादर करताना स्पर्धक विद्यार्थी.

कलाप्रकारनिहाय अनुक्रमे विजेते असे- (लोककला)- विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, श्रीमती अक्काताई पाटील कन्या महाविद्यालय इचलकरंजी, व्यंकटेश महाविद्यालय इचलकरंजी. (लोकनृत्य)- आजरा महाविद्यालय आजरा, दत्ताजीराव कदम कॉलेज इचलकरंजी, कर्मवीर हिरे महाविद्यालय गारगोटी. (मूकनाट्य)- विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर, देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर. (नकला)- राजाराम कॉलेज कोल्हापूर, दत्ताजीराव कदम कॉलेज इचलकरंजी, डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर. (मराठी वक्तृत्व)- भोगावती महाविद्यालय कुरुकली, यशवंतराव चव्हाण कॉलेज हलकर्णी, विवेकानंद कॉलेज. (हिंदी वक्तृत्व)- विवेकानंद कॉलेज, न्यू कॉलेज कोल्हापूर, शहाजी लॉ कॉलेज कोल्हापूर. (इंग्रजी वक्तृत्व)- विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, के. आय. टी. कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर.

(वादविवाद)- डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर, के. आय. टी. कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर, न्यू कॉलेज कोल्हापूर. (सुगम गायन)- न्यू कॉलेज कोल्हापूर, विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर. (लोकसंगीत वाद्यवृंद)- विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, न्यू कॉलेज कोल्हापूर, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर. (लघुनाटिका)- शिव-शाहू महाविद्यालय सरुड, देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स कोल्हापूर, भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग कोल्हापूर. (एकांकिका)- शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, दत्ताजीराव कदम कॉलेज इचलकरंजी, विवेकानंद कॉलेज कोल्हापूर. (समूह गीत)- विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, दत्ताजीराव कदम कॉलेज इचलकरंजी, देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज कोल्हापूर. (पथनाट्य)- आनंदी बी फार्मसी कॉलेज कळंबे तर्फ कळे, दूधसाखर महाविद्यालय बिद्री, विवेकानंद कॉलेज कोल्हापूर. (प्रश्नमंजूषा)- तात्यासाहेब कोरे इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग वारणानगर, डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कोल्हापूर, महावीर महाविद्यालय कोल्हापूर.

### आटपाडीत मध्यवर्ती महोत्सव

शिवाजी विद्यापीठाचा मध्यवर्ती युवा महोत्सव १६ ते १८ ऑक्टोबर या कालावधीत होणार आहे. आटपाडी येथील श्रीमंत बाबासाहेब देशमुख महाविद्यालय संयोजक आहे. जिल्हास्तरीय युवा महोत्सवातील प्रथम तीन विजेते महाविद्यालये मध्यवर्ती युवा महोत्सवात प्रतिनिधित्व करतील.

Scanned with CamScanner

सकाळ

बुधवार,
१२ ऑक्टोबर २०२२

# शिबिरात ५५ जणांचे रक्तदान

**इचलकरंजी :** दत्ताजीराव कदम एएससी महाविद्यालयात रक्तदान शिबिर झाले. एनसीसी व एनएसएस विभागाच्या यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रक्तदान शिबिरात ५५ विद्यार्थ्यांनी रक्तदान केले. प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली रक्तदान शिबिराचे आयोजन केले. नियोजन प्रा. मेजर मोहन विरकर, अरुण कटकोळे यांनी केले. डॉ. एस. टी. इंगळे, प्रा. डी. ए. यादव, प्रा. प्रशांत कांबळे, प्रा. मधुमती शिंदे, प्रा. डी. जे. मुंगारे उपस्थित होते. यासाठी जीवनधारा ब्लड बँकचे सहकार्य लाभले.

CS Scanned with CamScanner

लोकमत 12/10/2022

## डीकेएएससीत भीत्तिपत्रिकेचे प्रदर्शन

इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात गणित विषयातील भीत्तिपत्रिका प्रदर्शन आयोजित केले होते. प्रदर्शनाचे उद्घाटन प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी केले.

विद्यार्थ्यांनी विविध संकल्पना गेम थेरी, पास्कल ट्रँगल, ॲप्लिकेशन्स, मॅथेमेटिक्स इन म्युझिक, करिअर इन मॅथेमॅटिक्स यावर आधारित भीत्तिपत्रिका प्रदर्शित केल्या. यावेळी डी. ए. यादव, डी. जे. मुंगारे, विनायक गनबावले, दीपक कुंभार, वृषाली हत्तरगी, स्वाती खोत, आदी उपस्थित होते. किरण जुगले हिने सूत्रसंचालन व निकिता मोहिते हिने आभार मानले.

CS Scanned with CamScanner

तरुण भारत
गुरुवार, १३ ऑक्टोबर २०२२

# युवा महोत्सवात विवेकानंद कॉलेजचे वर्चस्व

## महोत्सवात गडहिंग्लजकरांचा चांगला प्रतिसाद : १६ ते १८ ऑक्टोबरला आटपाटीत मध्यवर्ती युवा महोत्सव

प्रतिनिधी
गडहिंग्लज

डॉ. घाळी कॉलेज येथे शिवाजी विद्यापीठाचा जिल्हास्तरीय युवा महोत्सवात कोल्हापूरच्या विवेकानंद कॉलेजचे वर्चस्व दिसून आले. आता शिवाजी विद्यापीठाचा मध्यवर्ती युवा महोत्सव आटपाटी (जि. सांगली) येथील बाबासाहेब देशमुख महाविद्यालयात १६ ते १८ ऑक्टोबर अखेर पार पडणार आहे. पहिल्यांदाच झालेल्या जिल्हास्तरीय युवा महोत्सवात गडहिंग्लजकरांचा चांगला प्रतिसाद दिला आहे. स्पर्धेतील विजेत्यांना बक्षिसे देऊन गौरविण्यात येणार आहे,

**युवा महोत्सवातील अनुक्रमे विजेते असे**

**लोककला** – विवेकानंद कॉलेज कोल्हापूर, आक्काताई पाटील कन्या महाविद्यालय इचलकरंजी, व्यंकटेश महाविद्यालय इचलकरंजी.

**लोकनृत्य**– आजरा महाविद्यालय आजरा, दत्ताजीराव कदम महाविद्यालय, इचलकरंजी, कर्मवीर हिरे कॉलेज, गारगोटी.

**मूकनाट्य**– विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर, भारती विद्यापीठ, कोल्हापूर, रत्नाप्पा कुंभार कॉलेज, कोल्हापूर.

**नकला**– राजाराम कॉलेज, कोल्हापूर, दत्ताजीराव कदम कॉलेज, इचलकरंजी, डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज, कोल्हापूर.

**मराठी वक्तृत्व**– भोगावती महाविद्यालय, कुरूकली, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, हलकर्णी, विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर.

**हिंदी वक्तृत्व**– विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर, न्यू कॉलेज, कोल्हापूर, शहाजी लॉ कॉलेज, कोल्हापूर.

**इंग्रजी वक्तृत्व**– विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर, केआयटी कॉलेज, कोल्हापूर, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**वादविवाद**– डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज, कोल्हापूर, केआयटी कॉलेज, कोल्हापूर, न्यू कॉलेज, कोल्हापूर.

**सुगमगायन**– न्यू कॉलेज, कोल्हापूर, विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**लोकसंगीत वाद्यवृंद**– विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर, न्यू कॉलेज, कोल्हापूर, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**लघुनाटिका**– शिवशाहू महाविद्यालय, सरूड, रत्नाप्पा कुंभार कॉलेज, कोल्हापूर, भारती विद्यापीठ, कोल्हापूर.

**एकांकिका**– शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, दत्ताजीराव कदम कॉलेज, इचलकरंजी, विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर.

**समूहगीत**– विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर, दत्ताजीराव कदम, इचलकरंजी, रत्नाप्पा कुंभार कॉलेज, कोल्हापूर.

**पथनाट्य**– आनंदी कॉलेज, कळबे तर्फे कळे, दूधसागर महाविद्यालय, बिद्री, विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर.

**प्रश्नमंजूषा**– तात्यासाहेब कोरे इंजिनिअरींग कॉलेज, वारणानगर, डॉ. डी. वाय. पाटील, कोल्हापूर, महावीर कॉलेज, कोल्हापूर

CS Scanned with CamScanner

सकाळ

शुक्रवार, १४ ऑक्टोबर २०२२

# डीकेएएससी महाविद्यालयाचे यश

इचलकरंजी, ता. १३ : शिवाजी विद्यापीठात गांधी अभ्यास केंद्रातर्फे आयोजित पोस्टर मेकिंग स्पर्धेत डीकेएएससी महाविद्यालयाने यश मिळवले.

महात्मा गांधींच्या स्वप्नातील भारत, या विषयावर वनस्पतीशास्त्रचा विद्यार्थी वैभव गौंड याने तयार केलेल्या पोस्टरला द्वितीय क्रमांक मिळाला. प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांच्या हस्ते त्याचे अभिनंदन केले. प्रमाणपत्र व रोख रक्कम पारितोषिकाचे स्वरूप होते. डॉ. एस. टी. इंगळे, डॉ. एस. के. गावडे, मेजर मोहन वीरकर उपस्थित होते.

Scanned with CamScanner

सकाळ

शुक्रवार,
१४ ऑक्टोबर २०२२

# डीकेएएससीमध्ये पोस्टर प्रदर्शन

इचलकरंजी, ता. १३ : डीकेएएससी महाविद्यालयात बी. कॉम आय.टी विभागातर्फे पोस्टर प्रदर्शन झाले. 'अत्याधुनिक माहिती तंत्रज्ञान संकल्पना' या विषयावर विद्यार्थ्यांनी प्रदर्शन भरवले. प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी केले. विद्यार्थ्यांनी माहिती तंत्रज्ञानातून विकास, क्लौवूड कॉम्प्युटिंग, सायबर क्राईम, ५जी तंत्रज्ञान, डिजिटल मार्केटिंग आणि ब्लॉक चेन तंत्रज्ञान, असे विविध कलात्मक, प्रयोगशील पोस्टर तयार केले. उपप्राचार्य डॉ. डी. सी. कांबळे, प्रा डॉ. डी. ए. यादव यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक प्रेरणा हळदकर यांनी केले. अमृता निकम यांनी आभार मानले.

CS Scanned with CamScanner

सकाळ
कोल्हापूर, शुक्रवार, १४ ऑक्टोबर २०२२



इचलकरंजी : कन्या महाविद्यालयात रुमाली बुके तयार करण्याच्या कार्यशाळेत प्रा. मेजर मोहन वीरकर स्वागत करताना प्राचार्या डॉ. त्रिशला कदम.

# कन्या महाविद्यालयात कार्यशाळा

इचलकरंजी : येथील श्रीमती आक्काताई रामगोंडा पाटील कन्या महाविद्यालयात रुमाली बुके तयार करण्याची कार्यशाळा झाली. राष्ट्रीय छात्र सेना आणि महिला सक्षमीकरण व तक्रार निवारण समितीतर्फे आयोजन केले. प्रा. मेजर मोहन वीरकर यांनी विद्यार्थिनींना रुमाली बुके बनवण्याबाबत प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी प्राचार्या डॉ. त्रिशला कदम होत्या. कॅप्टन प्रमिला सुर्वे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. आभार प्रा. संगीता पाटील यांनी मानले.

CS Scanned with CamScanner

सकाळ

सोमवार,
१७ ऑक्टोबर २०२२

## वाचन प्रेरणा दिन

### डीकेएएससी महाविद्यालय

ग्रंथालय विभाग व मराठी विभागाच्या संयुक्त विद्यमाने वाचन प्रेरणा दिन झाला. ग्रंथपाल प्रा. विजय यादव यांनी समृद्धी ग्रंथालयातील ग्रंथसंपदा, नियतकालिके, विद्यार्थी केंद्रित उपक्रमांची माहिती दिली. दादासाहेब जगदाळे, मराठी अभ्यासक डॉ. ज्ञानेश्वर कांबळे यांनी महाविद्यालयाला ग्रंथ भेट दिले. ग्रंथालयात ग्रंथ प्रदर्शन मांडले. याचे उद्घाटन प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांच्या हस्ते झाले. विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. उपप्राचार्य प्रा. डी. ए. यादव, प्रा. डॉ. व्ही. पी. पाटील, डॉ. डी. जी. घोडके, मेजर मोहन वीरकर आदी उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner



इचलकरंजी : दत्ताजीराव कदम महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिनानिमित्त सामूहिक मूकवाचनातून ग्रंथांचा आनंद घेताना मान्यवर

# दत्ताजीराव कदम कॉलेजमध्ये वाचन प्रेरणादिन संपन्न

**केसरी वृत्तसेवा**

**इचलकरंजी :** येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज,इचलकरंजी मध्ये भारतरत्न डॉ ए.पी.जे.अब्दुल कलाम यांची जयंती 'वाचन प्रेरणा दिन' उत्साहात संपन्न झाला. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.अनिल पाटील होते. प्रास्ताविक प्रा.विजय यादव यांनी केले. कार्यक्रमात उपस्थितांनी सामूहिक मूकवाचनातून ग्रंथांचा आनंद घेतला. यावेळी अक्षरधारा प्रकाशनाचे दादासाहेब जगदाळे आणि डॉ.ज्ञानेश्वर कांबळे यांनी महाविद्यालयाला ग्रंथभेट दिली. यावेळी डॉ.डी.ए.यादव,.डॉ.व्ही.पी.पाटील, डॉ.डी.जी.घोड, मेजर मोहन विरकर यांनी मनोगत व्यक्त केली. विद्यार्थी आकाश सस्ते, सानिका शेट्टी, प्रियांका भाटले, संजीवनी कदम, हिना बागवान यांनी मनोगत व्यक्त केले. आभार प्रा. संजय सुतार, सूत्रसंचालन प्रा. भारती कोळेकर यांनी केले.

केसरी

9921600800

18-10-2022

सकाळ
मंगळवार,
१८ ऑक्टोबर २०२२




इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयातील एमएससीचा स्वागत समारंभ व अभिमुखता कार्यक्रम झाला.

## डीकेएएससीमध्ये अभिमुखता कार्यक्रम

**इचलकरंजी :** डीकेएएससी महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागातर्फे एम एससी भाग १ चा स्वागत समारंभ व अभिमुखता कार्यक्रम झाला. प्रमुख पाहुणे कोल्हापुरातील विवेकानंद महाविद्यालयाचे प्रोफेसर डॉ. एस. एस. अंकुशराव उपस्थित होते. त्यांनी एम एस्सीनंतरच्या नोकरीच्या संधी आणि संशोधनातील संधी याबद्दल मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी उपप्राचार्य प्रा. डी. ए. यादव होते. प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. आभार प्रा. एस. आर. मोरे यांनी मानले. सूत्रसंचालन श्रुतिका गाडेकर आणि आरजू शेख यांनी केले.

CS Scanned with CamScanner

सकाळ

मंगळवार,
१८ ऑक्टोबर २०२२

# भित्तीपत्रिका प्रदर्शनाचे आयोजन

**इचलकरंजी :** दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स कॉलेजमध्ये गणित व रिसर्च प्रमोशन अँड मॉनिटरिंग सेल विभागातर्फे भित्तीपत्रिका प्रदर्शन आयोजित केले. प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांच्याहस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. बी. एस्सी. भाग ३ गणित विभागातील विद्यार्थ्यांनी विविध संकल्पना गेम थेरी, पास्कल ट्रँगल, अँप्लिकेशन्स ऑफ मॅथेमॅटिकस, मॅथेमॅटिकस इन म्युसिक, कॅरियर इन मॅथेमॅटिकस आदी विषयावर आधारित भित्तीपत्रिका प्रदर्शित केल्या. प्राध्यापकांनी कलात्मक, प्रयोगशील पोस्टर उपक्रमाचे कौतुक केले. यावेळी उपप्राचार्य प्रा.डी.ए. यादव, विभागप्रमुख प्रा. डी. जे. मुंगारे, डॉ. विनायक गानबावले, डॉ. दिपक कुंभार डॉ. सागर सुतार, प्रा. वृषाली हत्तरगी, प्रा. स्वाती खोत उपस्थित होते. निकिता मोहिते हीने आभार मानले. सूत्रसंचालन किरण जुगले हिने केले.

Scanned with CamScanner

लोकमत | कोल्हापूर, मंगळवार, दि. १८ ऑक्टोबर २०२२

# एकांकिकांनी गाजवला रंगमंच

## शिवाजी विद्यापीठ युवा महोत्सव; आटपाडीकरांची दाद

लक्ष्मण सरगर
लोकमत न्यूज नेटवर्क

आटपाडी : आटपाडी येथे सुरू असणाऱ्या शिवाजी विद्यापीठाच्या मध्यवर्ती युवा महोत्सवामध्ये सोमवारी विविध सामाजिक विषयावर भाष्य करणाऱ्या एकांकिका सादर करण्यात आल्या. या एकांकिकांमधून विविध मानवी भावनांचा आविष्कार पहायला मिळाला.

आटपाडीच्या श्रीमंत बाबासाहेब देशमुख महाविद्यालयात सोमवारची सकाळ पाश्चिमात्य समूहगीतांनी उजाळली. यानिमित्ताने युवकांच्या मनावर गारुड केलेल्या विविध पाश्चिमात्य गीतांची झलक पहायला मिळाली. युवा महोत्सवात एक महत्त्वाचा भाग म्हणून एकांकिका गटाकडे पाहिले जाते. गेल्या दोन ते तीन महिन्यापासूनच तयारी करीत असलेल्या विद्यार्थ्यांनी आपल्या अभिनयाचा कस लावून दमदार सादरीकरण केले. यामध्ये 'भगदाड' या एकांकिकेतून एका सामान्य कुटुंबाच्या घरामध्ये भिंतीला भगदाड पाडून चोरी होते. त्यानंतर प्रशासन आणि नेत्यांचे राजकारण यावर भाष्य करणारी एकांकिका सादर केली. 'म्याडम' ही एकांकिका सामान्य कुटुंबातील महिलेने आपल्या मुलीला शिकवण्यासाठी जिद्दीने केलेली धडपड यावर भाष्य करते.



आटपाडी येथे आयोजित विद्यापीठाच्या मध्यवर्ती युवा महोत्सवात विद्यार्थ्यांनी पाश्चिमात्य समूहगीत सादर केले.

'श्री श्री १०८ दगड' ही एकांकिका निसर्गात असणाऱ्या दगडाला दिलेले महत्त्व व त्या दगडाचे स्वतःचे असणारे दुःख, व्यथा यावर भाष्य करते. 'लालटेन' ही एकांकिका वसतिगृहात नव्याने राहण्यासाठी आलेले विद्यार्थी व अगोदर राहत असणारे विद्यार्थी यांच्यामधील कुरघोड्या, भांडण, अशी पार्श्वभूमी मांडते.

'म्हातारा पाऊस' ही एकांकिका ग्रामीण जीवनातील घटनेवर भाष्य करते.

Scanned with CamScanner

**थोडक्यात महत्त्वाचे**

# समाज अध्ययनात समाजशास्त्राची भूमिका महत्त्वाची : प्रा. डॉ. [redacted]



मिरज : आयोजित व्याख्यान कार्यक्रमात बोलताना प्रा. डॉ. रुपाली सांभारे बाजूला अन्य.

प्रतिनिधी
मिरज

भारतीय समाजापुढील आव्हाने कमी करण्यासाठी समाजशास्त्र अनेक अंगाने उपयोगाचे असून, समाजाच्या अध्ययनात समाजशास्त्र विभाग महत्त्वाची भुमिका बजावत असल्याचे प्रतिपादन दत्ताजीराव कदम कॉलेज, इचलकरंजीच्या समाजशास्त्र विभागातील प्रा. डॉ. रुपाली सांभारे यांनी केले.

येथील कन्या महाविद्यालयात अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष आणि समाजशास्त्र विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित समाजशास्त्राची उपयोगिता या विषयावर प्रा. सांभारे यांचे व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. उल्हास माळकर होते. कार्यक्रमास डॉ. माधुरी देशमुख, प्रा. डॉ. गंगाधर चव्हाण, प्रा. डॉ. शबाना हळींगळे, प्रा.रमेश कट्टीमनी उपस्थित होते.

प्रा. सांभारे यांनी, समाजशास्त्राचा अभ्यास विषय, समाजिक समस्यांचा अभ्यास करताना समाजशास्त्राचा होणारा उपयोग, समाजशास्त्राचा व्यावहारिक जीवनातील उपयोग, करियरच्या दृष्टीने होणारे फायदे तसेच एमील दुर्खीम यांचा आत्महत्तेचा सिद्धांत याबाबत स्पष्टीकरण दिले. आभार प्रा.डॉ. विनायक पवार यांनी मानले

लोकमत कोल्हापूर, बुधवार, दि. १९ ऑक्टोबर २०२२

# मध्यवर्ती युवा महोत्सवात कोल्हापूरचा डंका

## तरुणाईचा जल्लोष : लोककला, शास्त्रीय नृत्य, नाटक, संगीत विभागात 'विवेकानंद'ची बाजी

लक्ष्मण सरगर
लोकमत न्यूज नेटवर्क

आटपाडी : तरुणाईच्या जल्लोषात भर घालणाऱ्या शिवाजी विद्यापीठाच्या ४२ व्या मध्यवर्ती युवा महोत्सवामध्ये कोल्हापूरच्या विवेकानंद महाविद्यालय, आजरा महाविद्यालयाने वर्चस्व सिद्ध केले. सरदार बाबासाहेब माने लोककला व लोकनृत्य फिरता चषक, विलिंग्डन महाविद्यालय शताब्दी महोत्सव फिरता चषक पटकावला. विवेकानंदच्या संघाने वैयक्तिक व सांघिक दोन्ही प्रकारात प्रथम कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार जनरल चॅम्पियनशिप पटकावली.



आटपाडी येथे मंगळवारी शिवाजी विद्यापीठाच्या ४२व्या मध्यवर्ती युवक महोत्सवाच्या समारोपप्रसंगी कुलगुरू डी. टी. शिर्के यांच्यासमोर विद्यार्थ्यांनी कलाविष्कार सादर केला. यावेळी आटपाडी एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष अमरसिंह देशमुख, डॉ. सुभाष करांडे, एच. यू. पवार, डॉ. आर. व्ही. गुरव, प्राचार्य विजय लोंढे, डॉ. दत्तात्रय जाधव आदी उपस्थित होते.

स्पर्धेचा निकाल (अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय) वैयक्तिक स्पर्धा प्रकार : शास्त्रीय नृत्य : रत्नाप्पा कुंभार (कोल्हापूर), आनंदराव नाईक (चिखली), शिंदे कॉलेज (कोल्हापूर). नकला : वाय. सी. इन्स्टिट्यूट (सातारा), राजाराम (कोल्हापूर), मुधोजी (फलटण)

एकपात्री अभिनय : सावित्रीबाई फुले महिला (सातारा), व्यंकटेश्वरा (पेठनाका), गव्हर्न्मेंट इंजिनिअरिंग (कराड), रत्नाप्पा कुंभार (कोल्हापूर) (विभागून). सुगम गायन : आर्ट्स, कॉमर्स, सायन्स (कऱ्हाड), विलिंग्डन (सांगली), न्यू कॉलेज (कोल्हापूर) शास्त्रीय गायन : शिवाजी विद्यापीठ, न्यू कॉलेज (कोल्हापूर), विवेकानंद (कोल्हापूर)

पाश्चिमात्य एकल गायन : देशभक्त रत्नाप्पा कुंभार (कोल्हापूर), विवेकानंद (कोल्हापूर), डी. वाय. पाटील (कोल्हापूर), यशवंतराव चव्हाण (सातारा) (विभागून), शास्त्रीय सूरवाद्य : आनंदराव नाईक (चिखली), देशभक्त रत्नाप्पा कुंभार (कोल्हापूर), विवेकानंद (कोल्हापूर), शास्त्रीय तालवाद्य : यशवंतराव चव्हाण (इस्लामपूर) आनंदराव नाईक (चिखली), अण्णासाहेब डांगे (आष्टा), पश्चिमात्य एकल वादन : बापूजी साळुंखे (मिरज), विवेकानंद (कोल्हापूर), गवर्न्मेंट इंजिनिअरिंग (कराड).

स्थळचित्रण : दत्ताजीराव कदम (इचलकरंजी), शिवराज (गडहिंग्लज), सद्गुरू (कराड), व्यंगचित्र : दत्ताजीराव कदम (इचलकरंजी), शिवाजी विद्यापीठ, मुधोजी (फलटण), विवेकानंद (कोल्हापूर) (विभागून). भित्तीचित्र : सावित्री फुले महिला (सातारा), मुधोजी (फलटण), आनंदराव नाईक (चिखली). कातरकाम : शिवराज (गडहिंग्लज), सद्गुरू (कराड), न्यू कॉलेज (कोल्हापूर). स्थळ छायाचित्रण : विवेकानंद (कोल्हापूर), मुधोजी (फलटण), आजरा (आजरा). माती काम : राजाराम (कोल्हापूर), दत्ताजीराव कदम (इचलकरंजी), वेणूताई चव्हाण (कऱ्हाड), डी. पी. भोसले (कोरेगाव) (विभागून). रांगोळी : यशवंतराव (हलकर्णी), कलाप्रबोधनी (कोल्हापूर), शिवराज (गडहिंग्लज). मेहंदी : चव्हाण (सातारा), नाना पाटील (वाळवा), डी. वाय. पाटील (कोल्हापूर). वक्तृत्व (मराठी) : भोगावती (कुरूकली), गरवारे (सांगली), छत्रपती शिवाजी (सातारा). वक्तृत्व (हिंदी) : डी. पी. भोसले (कोरेगाव), न्यू कॉलेज (कोल्हापूर), आरवडे (सांगली). वक्तृत्व (इंग्रजी) : विवेकानंद (कोल्हापूर), गव्हर्न्मेंट कॉलेज (कराड), शिवाजी विद्यापीठ (कोल्हापूर). लोकनृत्य : आजरा महाविद्यालय (आजरा), यशवंतराव चव्हाण (इस्लामपूर), यशवंतराव चव्हाण (सातारा), दत्ताजीराव कदम (इचलकरंजी) (विभागून). लोककला : सावित्रीबाई फुले महिला (सातारा), विवेकानंद (कोल्हापूर) (विभागून), आक्काताई पाटील (इचलकरंजी), दहिवडी (दहिवडी) (विभागून), आनंदराव नाईक (चिखली), श्री वेंकटेश (इचलकरंजी) (विभागून). एकांकिका : दत्ताजीराव कदम (इचलकरंजी), बयाबाई कदम (कडेगाव), आर्ट्स अँड कॉमर्स (नागठाणे).

सर्वोत्कृष्ट पुरुष अभिनय एकांकिका : विवेकानंद (कोल्हापूर), छत्रपती शिवाजी (सातारा), सर्वोत्कृष्ट स्त्री अभिनय एकांकिका : आर्ट्स अँड कॉमर्स (नागठाणे), दत्ताजीराव कदम (इचलकरंजी), शंकरराव जगताप (वाघोली), बयाबाई कदम (कडेगाव) (विभागून)

लघुनाटिका : श्री शिवशाहू (सरूड), मुधोजी (फलटण), धनंजयराव गाडगीळ (सातारा), भारती इंजिनिअरिंग (कोल्हापूर), मूकनाट्य : दहिवडी कॉलेज (दहिवडी), विवेकानंद (कोल्हापूर), रत्नाप्पा कुंभार (कोल्हापूर). पथनाट्य : राजमती (सांगली), विवेकानंद (कोल्हापूर), दूधसाखर (बेंद्रे). भारतीय समूह गीत : विवेकानंद (कोल्हापूर), रत्नाप्पा कुंभार (कोल्हापूर), दत्ताजीराव कदम (इचलकरंजी). पाश्चिमात्य समूहगीत : विवेकानंद (कोल्हापूर), मुधोजी (फलटण), यशवंतराव चव्हाण (सातारा). लोकवाद्य वृंद : मुधोजी (फलटण), विवेकानंद (कोल्हापूर), आनंदराव नाईक (चिखली), यशवंतराव चव्हाण (इस्लामपूर) (विभागून)

सांघिक रचना कृती : कॉलेज ऑफ आर्किटेक्चर (कोल्हापूर), शिवाजी विद्यापीठ (कोल्हापूर), रत्नाप्पा कुंभार (कोल्हापूर), वाद विवाद : गव्हर्न्मेंट कॉलेज (कऱ्हाड), विलिंग्डन (सांगली), केआयटी कॉलेज (कोल्हापूर). प्रश्नमंजूषा : यशवंतराव चव्हाण (सातारा), तात्यासाहेब कोरे इंजिनिअरिंग (वारणानगर) , डी. पी. भोसले (कोरेगाव).

सरदार बाबासाहेब माने लोककला फिरता चषक : सावित्रीबाई फुले (सातारा) व विवेकानंद (कोल्हापूर) सरदार बाबासाहेब माने लोकनृत्य फिरता चषक : आजरा महाविद्यालय (आजरा) विलिंग्डन महाविद्यालय शताब्दी महोत्सव फिरता गौरव चषक : नृत्य विभाग : लोकनृत्य : आजरा महाविद्यालय (आजरा), लोककला : सावित्रीबाई फुले (सातारा), शास्त्रीय नृत्य : विवेकानंद (कोल्हापूर)

नाट्य विभाग : विवेकानंद (कोल्हापूर), संगीत विभाग : विवेकानंद (कोल्हापूर). कला विभाग : दत्ताजीराव कदम (इचलकरंजी). वाङ्मय विभाग : गव्हर्मेंट इंजिनिअरींग (कऱ्हाड).

Scanned with CamScanner

तरुण भारत | गुरुवार, २० ऑक्टोबर २०२२

# युवा महोत्सवात कोल्हापूरच्या महाविद्यालयांचे वर्चस्व

## आटपाडीत तीन जिल्ह्याचा मध्यवर्ती महोत्सवाचे यशस्वी आयोजन : इचलकरंजी, गडहिंग्लज, आजरासह करवीरच्या कॉलेजची मोठी बाजी

प्रतिनिधी
आटपाडी

शिवाजी विद्यापीठाचा तीन जिल्ह्याचा मध्यवर्ती युवा महोत्सव यशस्वी करत आटपाडीतील श्रीमंत बाबासाहेब देशमुख महाविद्यालयाने शिवधनुष्य यशस्वी पेलले आहे. या महोत्सवात विविध स्पर्धांतून कोल्हापूर जिल्ह्यातील महाविद्यालयांनी वर्चस्व गाजवले.

दरम्यान, पारितोषिक समारंभावेळी युवा महोत्सव म्हणजे फक्त कलागुणांना वाव नसून तो संस्कृती जतन करण्याचा माग असल्याचे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. विद्यापीठाने संयोजनाची ही संधी दिल्याने कृतार्थ असल्याची भावना आटपाडी एज्युकेशनचे अध्यक्ष अमरसिंह देशमुख यांनी व्यक्त केली. विद्यापीठाच्या विद्यार्थी विकासचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी युवा महोत्सवातुन विद्यार्थ्यांचे भवितव्य घडत आहे. प्राचार्य डॉ. विजय लोंढे यांनी महोत्सव यशस्वी करण्यासाठी सर्वच घटकांनी योगदान दिल्याचे सांगितले.




आटपाडी : युवा महोत्सवातील विजेत्यांच्या गौरवप्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, अमरसिंह देशमुख व मान्यवर.

**मध्यवर्ती युवा महोत्सव स्पर्धांचा निकाल**

सरदार बाबासाहेब माने लोककला फिरता चषक सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय सातारा व विवेकानंद कॉलेज कोल्हापूर यांनी पटकाविला. लोकनृत्य फिरता चषक आजरा महाविद्यालयने पटकाविला.

विलिंग्डन महाविद्यालय शताब्दी महोत्सवानिमित्त गौरव चषकात लोकनृत्यात आजरा महाविद्यालय आजरा, तर शास्त्रीय नृत्यात विवेकानंद कॉलेज कोल्हापुर यांनी फिरता चषक पटकाविला. कोल्हापुरच्या विवेकानंद कॉलेजने नाट्य विभागातील सर्वच चषकावर नाव कोरले. संगित विभागातही विवेकानंद कॉलेजने वर्चस्व कायम ठेवले. दत्ताजीराव कदम आर्टस, सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज इचलकरंजी यांनी स्थळ चित्रण, व्यंगचित्रण, कातरकाम, मितीचित्र, स्थळ छायाचित्रण, मातीकाम, रांगोळी, सांघीक रचनाकृती, मेहंदी रचना विभागात वर्चस्व कायम ठेवले.

**कोल्हापूरचे विविध प्रकारात यश**

शास्त्रीय नृत्य-प्रथम-देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स तृतीय – डी. डी. शिंदे सरकार कॉलेज नकला – द्वितीय – राजाराम कॉलेज एकपात्री अभिनय – तृतीय – देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स उत्तेजनार्थ – राजाराम कॉलेज व केआयटी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग सुगम गायन – अनुक्रमे शिवाजी विद्यापीठ, न्यू कॉलेज, विवेकानंद कॉलेज पाश्चिमात्य एकल गायन – अनुक्रमे देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स, विवेकानंद कॉलेज, डी.वाय.पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग शास्त्रीय सुरवाद्य – द्वितीय – देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स तृतीय – विवेकानंद कॉलेज पाश्चिमात्य एकल वादन द्वितीय – विवेकानंद कॉलेज स्थळचित्रण – प्रथम – दत्ताजीराव कदम आर्टस सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज इचलकरंजी, द्वितीय – शिवराज कॉलेज ऑफ आर्टस कॉमर्स ॲण्ड डी. एस. कदम सायन्स कॉलेज गडहिंग्लज.

व्यंगचित्र – अनुक्रमे – दत्ताजीराव कदम आर्टस सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज इचलकरंजी, शिवाजी विद्यापीठ, विवेकानंद कॉलेज उत्तेजनार्थ – देशभक्त रत्नाप्पा कुंभार कॉलेज ऑफ कॉमर्स.

मितीचित्र – उत्तेजनार्थ – दत्ताजीराव कदम आर्टस सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज इचलकरंजी.

कातरकाम – प्रथम – शिवराज कॉलेज ॲण्ड डी. एस. कदम सायन्स कॉलेज गडहिंग्लज, तृतीय – न्यू कॉलेज.

स्थळ छायाचित्रण – प्रथम – विवेकानंद कॉलेज, तृतीय–आजरा महाविद्यालय, उत्तेजनार्थ – शिवाजी विद्यापीठ.

मातीकाम – प्रथम – राजाराम कॉलेज, द्वितीय – दत्ताजीराव कदम कॉलेज इचलकरंजी.

रांगोळी – प्रथम – यशवंतराव चव्हाण कॉलेज हलकर्णी, द्वितीय – कला प्रबोधनीचे इन्स्टीट्युट ऑफ डिझाईन, तृतीय – शिवराज कॉलेज ऑफ आर्टस गडहिंग्लज.

मेहंदी– तृतीय – डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग.

वक्तृत्व – मराठी – प्रथम – भोगावती महाविद्यालय, हिंदीत – द्वितीय – न्यु कॉलेज इंग्रजी – प्रथम – विवेकानंद कॉलेज, तृतीय – शिवाजी विद्यापीठ.

**विवेकानंद कॉलेजला दुहेरी चॅम्पियनशीप**

विवेकानंद कॉलेजने शिवाजी विद्यापीठाच्या प्रथम कुलगुरू स्व. डॉ.आप्पासाहेब पवार वैयक्तिक स्पर्धा जनरल चॅम्पियनशीप व अभिजितदादा कदम सांघिक स्पर्धा जनरल चॅम्पियनशिपावर नाव कोरले.

Scanned with CamScanner

तरुण भारत | गुरुवार, २० ऑक्टोबर २०२२



इचलकरंजी : राष्ट्रीय योगासन स्पर्धेत सुवर्णपदक प्राप्त विद्यार्थ्यांसमवेत प्राचार्य अनिल पाटील, प्रा. मेजर मोहन वीरकर व मार्गदर्शक.

# डीकेएएससी महाविद्यालयाला राष्ट्रीय योगासन स्पर्धेमध्ये दोन सुवर्णपदके

प्रतिनिधी
इचलकरंजी

येथील दत्ताजीराव कदम आर्टस्, सायन्स अँड कॉमर्स कॉलेजतील बी. कॉम. भाग दोनचे खेळाडू सानिका जाधव व बी. एस्सी भाग एकमधील मनन नरेंद्र कासलीवाल यांनी गुजरातमधील अहमदाबाद येथे झालेल्या ३६ व्या नॅशनल गेम्स योगासन स्पर्धेत महाविद्यालयाला सुवर्ण पदके मिळवून दिली. सानिका जाधव हिने आर्टिस्टिक पीयर प्रकारात महाराष्ट्राला सुवर्णपदक मिळवून दिले. मनन कासलीवाल यांनी आर्टिस्टिक पियर प्रकारात रौप्य पदक, रीधमिक पीएर प्रकारात रौप्य आणि सांघिक आर्टिस्टिक प्रकारात महाविद्यालयाला सुवर्णपदक मिळवून दिले.

देशात महाराष्ट्र राज्य पदक तालिकेत तिसऱ्या क्रमांकांवर असताना संपूर्ण महाराष्ट्राचे डोळे योगासन या खेळाकडे लागले होते. त्यात या महाविद्यालयातील खेळाडूंनी महाराष्ट्राला सुवर्णपदक मिळवून देऊन जनरल चॅम्पियनशिप मिळवून दिली. या खेळाडूंना श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे व सेक्रेटरी शुभांगी गावडे यांचे सहकार्य लाभले. खेळाडूंना प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांचे प्रोत्साहन लाभले. क्रीडा विभाग प्रमुख प्रा. मेजर मोहन वीरकर प्रा. एम. डी. लगीवाले व पी. एस. कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले. शिक्षक, प्रशासकीय सेवक व विद्यार्थी, विद्यार्थिनींनी खेळाडूंचे अभिनंदन केले.

Scanned with CamScanner

सकाळ
शुक्रवार,
२१ ऑक्टोबर २०२२



इचलकरंजी : सुवर्णपदक प्राप्त सानिका जाधव, मनन कासलीवाल यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. अनिल पाटील.

# दत्ताजीराव कदम कॉलेजचे यश

**इचलकरंजी :** दत्ताजीराव कदम आर्टस्, सायन्स अँड कॉमर्स कॉलेजच्या खेळाडूंनी राष्ट्रीय योगासन स्पर्धेत देदीप्यमान कामगिरी केली. महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवत महाराष्ट्र संघाला दोन सुवर्णपदके मिळवून दिली. सानिका जाधव हिने आर्टिस्टिक पियर प्रकारात महाराष्ट्राला सुवर्णपदक मिळवून दिले. मनन कासलीवाल यांनी आर्टिस्टिक पियर आणि रिधमिक पियर प्रकारात रौप्य आणि सांघिक आर्टिस्टिक प्रकारात सुवर्णपदक मिळवून दिले. खेळाडूंना श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे व सेक्रेटरी शुभांगी गावडे, विश्वस्त कौस्तुभ गावडे यांचे सहकार्य मिळाले. खेळाडूंचा प्राचार्य डॉ. अनिल पाटील, उपप्राचार्य प्रा. डी. ए. यादव यांच्या हस्ते सत्कार झाला.

CS Scanned with CamScanner

पुढारी ५

सोमवार, २४ ऑक्टोबर २०२२

## प्रा. अंजली उबाळे यांना पीएच.डी.



**कोल्हापूर :** डी.के.ए.एस.सी. महाविद्यालय इचलकरंजी येथे हिंदी विभागामध्ये कार्यरत असणाऱ्या येथील प्रा. अंजली उबाळे यांनी शिवाजी विद्यापीठाची हिंदी विषयातील पीएच.डी. पदवी प्राप्त केली. त्यांनी मॉरिशसमधील भारतवंशी समाज जीवनाचा सांगोपांग अभ्यास करून 'अभिमन्यू अनंत के उपन्यासों में संघर्ष' विषयावर प्रबंध सादर केला. त्यांना डॉ. दिलीपकुमार कसबे, डॉ. आशा मणियार, डॉ. अर्जुन चव्हाण, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, डॉ. व्ही. एस. ढेकळे यांचे मार्गदर्शन लाभले.

CS Scanned with CamScanner

लोकमत

epaper.lokmat.com ४

, सोमवार, दि. २४ ऑक्टोबर २०२२


# प्रा.अंजली उबाळे यांना पीएच.डी



**कोल्हापूर :** इचलकरंजीतील डी.के.ए.एस.सी. महाविद्यालय येथे हिंदी विभागामध्ये कार्यरत प्रा. अंजली महेश उबाळे यांनी शिवाजी विद्यापीठाची हिंदी विषयातील पीएच.डी पदवी प्राप्त केली आहे. त्यांनी मॉरिशसमधील भारतवंशी समाज जीवनाचा सांगोपांग अभ्यास करून 'अभिमन्यू अनत के उपन्यासों में संघर्ष' या विषयावर प्रबंध सादर केला. त्यांना डॉ. दिलीपकुमार कसबे एस.जी.एम. कॉलेज कराड, डॉ.आशा मणियार, डॉ.अर्जुन चव्हाण, प्राचार्य डॉ.आर.आर. कुंभार, डॉ.व्ही.एस. ढेकळे, डॉ. अनिल पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.


CS Scanned with CamScanner

दक्षिण महाराष्ट्र
केसरी

२४ ऑक्टोबर २०२२/६

# दत्ताजीराव कदम महाविद्यालयाला योगासन स्पर्धेमध्ये दोन सुवर्णपदके

केसरी वृत्तसेवा

कोल्हापूर : श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे दत्ताजीराव कदम आर्टस्, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज इचलकरंजी महाविद्यालयातील दोनचे खेळाडू सानिका जाधव व मनन नरेंद्र कासलीवाल यांनी गुजरात मधील अहमदाबाद येथे झालेल्या ३६ व्या नॅशनल गेम्स योगासन स्पर्धेत महाविद्यालयाला सुवर्ण पदके मिळवून दिली.



कोल्हापूर : दत्ताजीराव कदम महाविद्यालयाला राष्ट्रीय योगासन स्पर्धेमध्ये दोन सुवर्णपदके मिळवली.

सानिका जाधव हिने आर्टिस्टिक पीयर प्रकारात महाराष्ट्राला सुवर्णपदक मिळवून दिले, तर मनन कासलीवालयांनी आर्टिस्टिक पियर प्रकारात रोप्य पदक, रीधमिक पीएर प्रकारात रौप्य आणि सांघिक आर्टिस्टिक प्रकारात महाविद्यालयाला सुवर्णपदक मिळवून दिले. राज्याच्या तुलनेत महाराष्ट्र राज्य पदक तालिकेत तिसऱ्या क्रमांकावर असताना संपूर्ण महाराष्ट्राचे डोळे फक्त योगासन खेळाकडे होते. त्यात या महाविद्यालयातील खेळाडूंनी सुवर्णपदक मिळवून देऊन महाराष्ट्राला जनरल चॅम्पियनशिप मिळवून दिली.

या खेळाडूंना संस्थेचे कार्याध्यक्षप्राचार्य अभयकुमार साळुंखे व शुभांगी गावडे यांचे सहकार्य मिळाले. प्राचार्य. डॉ अनिल पाटील यांचे खेळाडूंना प्रोत्साहन लाभले. महाविद्यालयाचे प्रा. मेजर मोहन वीरकर, प्रा.एम. डी. लगीवाले व पी. एस. कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले.

CS Scanned with CamScanner

दक्षिण महाराष्ट्र
केसरी
सोमवार, २४ ऑक्टोबर २०२२

# विद्यापीठ युवा महोत्सवात डी. के. ए. एस. सी.चे यश

**इचलकरंजी :** शिवाजी विद्यापीठाचा या मध्यवर्ती युवा महोत्सव नुकताच आटपाडी येथील श्रीमंत बाबासाहेब देशमुख महाविद्यालयात संपन्न झाला. या युवा महोत्सवात इचलकरंजी येथील डीकेएएससी महाविद्यालयाने घवघवीत यश संपादन केले.

युवा महोत्सवात इचलकरंजी येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स कॉलेजचा एकूण कलाप्रकारांमध्ये विद्यार्थ्यांचा संघ सहभागी झाला होता. यामध्ये कलाप्रकारांत महाविद्यालयाने प्रावीण्य संपादन केले. यासह महाविद्यालयाने विलिंग्डन महाविद्यालय शतकमहोत्सव कला विभागाचा 'फिरता चषक' पटकावला. या यशाबद्दल प्राचार्य डॉ.अनिल पाटील यांनी विद्यार्थी, प्राध्यापक यांचे अभिनंदन केले. समन्वयक डॉ.डी.सी कांबळे, प्रा.सुनीता वेल्हाळ, डॉ.पद्मश्री वाघमारे यांचे मार्गदर्शन लाभले.

स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, प्राचार्य शुभांगी गावडे, प्राचार्य डॉ.राजेंद्र शेजवळ आणि प्रा.कौस्तुभ गावडे यांचे मार्गदर्शन लाभले.



आटपाडी येथे झालेल्या युवा महोत्सवात यश मिळवलेले इचलकरंजीतील डीकेएएससी महाविद्यालयाचे विद्यार्थ्यांसह शिक्षक.

CS Scanned with CamScanner

सकाळ

सोमवार,
२४ ऑक्टोबर २०२२

# विद्यापीठ युवा महोत्सवात 'डीकेएएससी'चे यश

इचलकरंजी, ता. २३ : शिवाजी विद्यापीठाच्या ४२ व्या मध्यवर्ती युवा महोत्सवात डीकेएएससी महाविद्यालयाने घवघवीत यश संपादन केले. हा महोत्सव आटपाडी (जि. सांगली) येथील श्रीमंत बाबासाहेब देशमुख महाविद्यालयात झाला. महाविद्यालयाने विलिंग्डन महाविद्यालय शतकमहोत्सव कला विभागाचा फिरता चषक पटकावत नाव कोरले. युवा महोत्सवात महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाने दहा कलाप्रकारांत प्रावीण्य मिळवले. महोत्सवात ३१ कलाप्रकारांमध्ये ३८ विद्यार्थ्यांचा संघ सहभागी झाला होता.

युवा महोत्सवात स्थळचित्रण - प्रथम, व्यंग्यचित्र -प्रथम, एकांकिका -प्रथम, मातीकाम -द्वितीय, समूहगीत-तृतीय, लोकनृत्य- तृतीय, भित्तिपत्रक - उत्तेजनार्थ, सांघिक रचनाकृती- उत्तेजनार्थ, सर्वोत्कृष्ट पुरुष अभिनय- महेश गवंडी, सर्वोत्कृष्ट स्त्री अभिनय-समीक्षा संकपाळ अशा विविध विभागांतील कलाप्रकारांत महाविद्यालयाने यशस्वी ठसा उमटवला. यासह विलिंग्डन महाविद्यालय शतकमहोत्सव कला विभागाचा फिरता चषक पटकावत डीकेएएससी महाविद्यालयाच्या समृद्ध परंपरेत भर घातली. यशाबद्दल प्राचार्य डॉ. अनिल पाटील यांनी यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक प्राध्यापकांचा सत्कार केला. यशामुळे शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात महाविद्यालयाने वेगळी ओळख कायम ठेवली आहे.



इचलकरंजी : युवा महोत्सवात डीकेएएससी महाविद्यालयाच्या यशस्वी सांस्कृतिक विभागाच्या सत्कारप्रसंगी प्राचार्य डॉ. अनिल पाटील, प्रा. डॉ. डी. सी. कांबळे आदी.

Scanned with CamScanner

सकाळ



इचलकरंजी : आरडीपरेड निवड शिबिरासाठी निवड झालेल्या आर्य उकले व सुयश चव्हाण यांचा सत्कार करताना डॉ. अनिल पाटील, भूपाल कुंभार.

# ‘डीकेएएससी’च्या दोघांची निवड

इचलकरंजी : ‘डीकेएएससी’ महाविद्यालयाच्या दोन एनसीसी कॅडेटची इंटरग्रुप आरडीपरेड शिबिरासाठी निवड झाली आहे. आर्य उकले व सुयश चव्हाण अशी त्यांची नावे आहेत. निवडीबद्दल प्राचार्य डॉ. अनिल पाटील, स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे आजीव सेवक भूपाल कुंभार यांच्या हस्ते त्यांचा सत्कार केला. हे दहादिवसीय शिबिर पुणे येथे होणार आहे. कोल्हापूर येथे झालेल्या शिबिरातून त्यांची निवड झाली. दोघांना एनसीसी विभागप्रमुख प्रा. मेजर मोहन वीरकर यांचे मार्गदर्शन लाभले.

Kolhapur, Gadhinglaj-Today
26/10/2022 Page No. 4

तरुण भारत शनिवार, २९ ऑक्टोबर २०२२

# डीकेएएससीमध्ये दिवाळी अंक प्रकाशन

**इचलकरंजी :** दत्ताजीराव कदम आर्टस, सायन्स अँड कॉमर्स कॉलेजमध्ये येथे पद्मरत्न दिवाळी अंकाचा प्रकाशन समारंभ उत्साहात झाला. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. अनिल पाटील होते. डॉ. पाटील म्हणाले, मराठी साहित्य विश्वात दिवाळी अंकांची समृद्ध परंपरा आहे. दिवाळी अंकांनी मराठी संस्कृतीत अनेक प्रथितयश साहित्यिक घडवले आहेत. २०२२ चा पद्मरत्न दिवाळी अंक सुप्रसिद्ध तसेच नवोदितांच्या साहित्याने सजलेला असून तो दर्जेदार आहे. असा अंक महाविद्यालयात प्रकाशित होत आहे ही गौरवास्पद बाब आहे. ज्येष्ठ कवी पाटलोबा पाटील यांनी दिवाळी अंकाचे प्रकाशन महाविद्यालयात होणे ही नाविन्यपूर्ण व प्रयोगशील घटना असल्याचे नमूद केले. कवयित्री प्रतिभा पैलवान यांनी मनोगत व्यक्त केले. प्रकाशक दादासाहेब जगदाळे यांचा महाविद्यालयाच्यावतीने सत्कार करण्यात आला. यावेळी संपादक वसंत पाटील, डॉ. डी. सी. कांबळे, प्रा. डी. ए. यादव, प्रा. टी. ए. हराळे, डॉ. डी. जी. धोंडके उपस्थित होते. कार्यक्रमाचे संयोजन प्रा. डॉ. ज्ञानेश्वर कांबळे व प्रा. भारती कोळेकर यांनी केले. प्रास्ताविक मराठी विभागप्रमुख प्रा. संजय सुतार यांनी केले. प्रियांका भाटले यांनी स्वागत केले. आभार अवंतिका खराडे यांनी मानले. सूत्रसंचालन मैथिली मुदगल यांनी केले.

Scanned with CamScanner

सकाळ
मंगळवार,
१ नोव्हेंबर २०२२

# दौडमधून एकतेचा संदेश

## इचलकरंजीत सरदार पटेल जयंती; विद्यार्थी, अधिकारी, नागरिकांचा सहभाग

इचलकरंजी, ता. ३१ : सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक सुधाकर देशमुख यांच्या नेतृत्वाखाली इचलकरंजी शहरात रन फॉर युनिटीचा संदेश देत एकता दौड काढण्यात आली. सरदार वल्लभभाई पटेल यांचा जन्म दिन राष्ट्रीय एकता दिवस म्हणून उत्स्फूर्तपणे साजरा करण्यात आला. प्रमुख तीन ठिकाणांहून काढण्यात आलेल्या एकता दौडमध्ये विद्यार्थी, अधिकारी, कर्मचारी, नागरिकांनी सहभाग घेत घोषणा देऊन शहर दणाणून सोडले. शहरात अशाप्रकारे पहिल्यांदाच एकता दौडचे आयोजन केले होते.






इचलकरंजी : १) सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त एकता दौड काढत शिवतीर्थावर उपस्थितांनी राष्ट्रीय एकात्मतेची शपथ घेतली. २) शाहू पुतळा चौकातून डीकेएएससी कॉलेजच्या एनएनसी कॅडेटसह खेळाडू एकतेचा नारा देत एकता दौड करत शिवतीर्थावर पोहोचले.

विविध तीन ठिकाणांहून सुरू झालेल्या एकता दौडीमध्ये सहायक आयुक्त केतन गुजर, नगरसचिव विजय राजापुरे, जलअभियंता सुभाष देशपांडे, विद्युत अभियंता संदीप जाधव, आरोग्य अधिकारी डॉ. सुनीलदत्त संगेवार, नगररचनाकार रणजित कोरे, वाहनआधीक्षक राजेंद्र मिरगे, क्रीडा अधिकारी शंकर पोवार, सहायक क्रीडा अधिकारी संजय कांबळे, नितीन बनगे हे अग्रभागी होते. अटल बिहारी वाजपेयी चौक, महात्मा गांधीजी पुतळा, शाहू पुतळा या ठिकाणी सकाळी साडेसहा वाजल्यापासून विद्यार्थी, खेळाडू, नागरिक एकत्र येत होते. शाहू पुतळा चौकातून प्रा. मेजर मोहन वीरकर यांच्या मार्गदर्शनाखाली डिकेएएससी कॉलेजच्या एनएनसी कॅडेटसह खेळाडूंनी एकतेचा नारा देत धावत शिवतीर्थावर पोहोचले. तसेच वाजपेयी चौकातून महानगरपालिका अधिकारी, कर्मचारी, तर गांधी पुतळा चौकातून मोठ्या प्रमाणात खेळाडू घोषणा देत दौड करत आले. वंदे मातरम, भारत माता की जय, हम सब एक है, अशा घोषणांनी सकाळच्या सुमारास शहरातील मुख्य मार्ग दणाणून गेला. जात पात के बंधन तोडो, भारत जोडो, अनेकता में एकता यही भारत की विशेषत:, सभी धर्म की एक पुकार एकता को करो साकार, भिन्न भाषा भिन्न देश, भारत हमारा एक देश असा संदेश देत दौड जनजागृती करण्यात आली.

शिवतीर्थावर दौडचा समारोप केला. प्रास्ताविकात राष्ट्रीय एकता दिनाची माहिती नगरसचिव विजय राजापुरे यांनी दिली. एनसीसी कॅडेट अर्पिता गड्डेने उपस्थितांना राष्ट्रीय एकात्मतेची शपथ दिली. एकता दौडीमध्ये महानगरपालिकेच्या सर्व विभागांचे विभागप्रमुख, अधिकारी आणि कर्मचारी यांसह शहरातील डीकेएएससी महाविद्यालयाचे एनएनसी युनिट, जयहिंद मंडळ, डायनामिक स्पोर्टस्, छत्रपती स्पोर्टस्, रिंगण फिटनेस क्लब, सीआरएसएसयू स्पोर्टस्, जिजाऊ स्पोर्टस्, महाराष्ट्र स्पोर्टस्, योगभवनचे सदस्य, शिवम आर्चरी स्पोर्टस्, पन्हाळकर स्पोर्टस्, वाघमारे स्पोर्टस्, सुभाष माने स्पोर्टस्‌चे खेळाडू सहभागी झाले.

### मॉर्निंग वॉकर्सही धावले...

शहरातील प्रमुख मार्गांवरून सकाळच्या सुमारास एकता दौड निघाली. दरम्यान, या मार्गावर सकाळच्या सुमारास मॉर्निंगसाठी नागरिकांची मोठी गर्दी असते. या वेळी दौडमध्ये सहभागी झालेल्या प्रत्येकाचा उत्साह पाहून मॉर्निंग वॉकर्सही सहभागी होत धावले.

Scanned with CamScanner

दैनिक **महासत्ता** इचलकरंजी

मंगळवार, ता.१ नोव्हेंबर २०२२

# इचलकरंजीत 'रन फॉर युनिटी'ला उत्स्फूर्त प्रतिसाद

इचलकरंजी,ता.३१–

**लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीचे औचित्य साधत इचलकरंजीत आयुक्त सुधाकर देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली 'रन फॉर युनिटी'चा संदेश देत एकता दौड काढण्यात आली. प्रमुख ३ ठिकाणाहून काढलेल्या या दौडमध्ये महाविद्यालयातील विद्यार्थी, महापालिकेचे अधिकारी, कर्मचारी, खेळाडु सहभागी झाले होते.**



राष्ट्रीय एकता दिनाचे औचित्य साधून महापालिकेचे प्रशासक सुधाकर देशमुख यांनी एकता दौडचे आयोजन केले होते. त्या अंतर्गत शाहु पुतळा चौकातून प्रा.मेजर मोहन वीरकर यांच्या मार्गदर्शनाखाली एनएनसी कॅडेटसह, खेळाडू एकतेचा नारा देत शिवतीर्थावर पोहचले. अटलबिहारी वाजपेयी चौकातून महापालिकेचे अधिकारी, कर्मचारी तर महात्मा गांधी पुतळा चौकातून खेळाडू घोषणाबाजी करत शिवतीर्थावर आले. या दौड दरम्यान वंदे मातरम, भारत माता की जय, हम सब एक हैं यासह विविध घोषणांनी मुख्यमार्ग दणाणून गेला होता. या दौडमध्ये सहाय्यक आयुक्त केतन गुजर, नगरसचिव विजय राजापुरे, जलअभियंता सुभाष देशपांडे, विद्युत अभियंता संदीप जाधव, आरोग्य अधिकारी डॉ.सुनीलदत्त संगेवार, नगररचनाकार रणजीत कोरे, वाहन अधिक्षक राजेंद्र मिरगे, क्रीडाअधिकारी शंकर पोवार, संजय कांबळे, एएससी महाविद्यालयाचे एनएनसी युनिट, जयहिंद मंडळ, डायनामिक स्पोर्ट्स, छत्रपती स्पोर्टस, रिंगण फिटनेस क्लब, सीआरएसएसयु स्पोर्टस, जिजाऊ स्पोर्टस, महाराष्ट्र स्पोर्टसचे खेळाडू, महापालिकेचे अधिकारी, कर्मचारी आणि नागरीक सहभागी झाले.

Scanned with CamScanner